# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत

**(१) ८७४४ (११-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेत डास नाशके व अळीनाशक औषध फवारणीचे काम करणाऱ्या १८१ कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद नसल्याकारणास्तव अचानक कामावरुन कमी केल्याबाबत पत्र दिल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांवर ऐन कोविड साथीच्या कालावधीत बेरोजगारी आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ ओढवलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार उक्त कर्मचाऱ्यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१) :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये "एकात्मिक डास निर्मुलन योजना/ठेका कर्मचारी" या कार्यक्रमाकरीता पुरेशी तरतूद उपलब्ध न झाल्याने दिनांक ०९/०५/२०२१ पासून १८१ कंत्राटी फवारणी कर्मचाऱ्यांचा पुरवठा बंद करण्याबाबत ठेकेदारास दिनांक ०८/०५/२०२१ च्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले, हे खरे आहे.

(२) व (३) सदर कार्यक्रम राबविणेकरीता आवश्यक तरतूद मिळणेकरीता दिनांक ११/०५/२०२१ रोजी पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव महासभेच्या मंजूरीकरीता सादर करण्यात आला आहे.

पुनर्विनियोजनाद्वारे तरतूद प्राप्त होईपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून औषधे खरेदी करण्यास व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणेस प्रशासकीय मान्यता मिळाल्याने दिनांक २६/०५/२०२१ पासून सर्व १८१ कंत्राटी फवारणी कर्मचाऱ्यांचा पुरवठा करण्याबाबत ठेकेदारास दिनांक २५/०५/२०२१ च्या पत्रान्वये महानगरपालिकेने कळविले, ही वस्तुस्थिती आहे.

सद्य:स्थितीत फवारणी कार्यक्रम पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(२) ८७४५ (१८-०६-२०२१) श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर अनधिकृत बांधकाम करून टॉवर आणि चाळी उभारून भूमाफियांनी विकास प्रकल्पाच्या जागा गिळंकृत केल्या असून कल्याण-डोंबिवलीत ५० हून अधिक ठिकाणी बेकायदा इमारतीचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवलीत कोरोनाचा प्रसार झपाट्याने वाढत असताना कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी एकीकडे महानगरपालिका प्रशासन झटत असताना दुसरीकडे मात्र भूमाफिया, वाळू माफिया, बनावट विकासक यांनी बेकायदा बांधकामे करण्यास जलदगतीने सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी भूमाफियांनी शासकीय जागाही बळकावल्या असून कल्याण तालुक्यात दोन हजारांहून अधिक महसूली, खाडी किनाऱ्याची जागा भूमाफियांनी गिळंकृत केल्यामुळे उक्त प्रकरणाची गंभीर दखल घेत शासकीय जागेवरील अनधिकृत बांधकामे तात्काळ निष्कासित करुन जागा ताब्यात घ्या असे स्पष्ट आदेश शासनाने दिले असूनही मेरिटईम बोर्ड, प्रांत, तहसिलदार यांनी सर्वेक्षण करण्यापलीकडे काहीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित भूमाफिया तसेच विकासक यांच्याशी संगनमत करून बांधकामास परवानगी देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करुन सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहित केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येते.

सदर आरक्षित भूखंडावर अनधिकृत टॉवर व चाळी उभारून भूमाफियांनी विकास प्रकल्पाच्या जागा हस्तगत केल्या अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांनी दिनांक ०८/०५/२०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवरील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची “संयुक्त कारवाई” करण्याची जबाबदारी निश्चित केलेली आहे.

महसूल विभागाचे उप विभागीय अधिकारी कल्याण यांचे नियंत्रण व पर्यवेक्षणाखाली बंदर हद्दीच्या पलीकडील व सी.आर.झेड. हद्दीमधील अनधिकृत बांधकामावर संयुक्तीकरित्या कारवाई करणेकामी महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याची तजविज ठेवली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात “प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी” अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व २६७(१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास “अधिकृतता” दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.

सदरचे बाधंकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिली जाते.

सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.

सन २०१५ ते मे, २०२१ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत १०९२२ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत तर ४२७ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केले असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील बाकळी नदीच्या तीरावरील एकलारा गावाला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३) ८७८० (२०-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील बाकळी नदीच्या तीरावरील गट ग्रामपंचायत बेनोडांतर्गत असलेल्या एकलारा गावाला पाणीपुरवठा करण्याकरीता जल

जीवन मिशन पाणीपुरवठा योजनेंतर्गत विहिरीचे बांधकामाकरीता रुपये १७,४०,८१७ खर्च करुनही गावकऱ्यांना अद्यापही योग्य स्थितीत पाणीपुरवठा होत नसल्याचे दिनांक ८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गावकऱ्यांना मूबलक पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१४-०९-२०२१) :** (१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील गट ग्रामपंचायत बेनोडा अंतर्गत एकलारा गावासाठी अद्याप जल जीवन मिशन अतंर्गत कोणतीही योजना मंजूर नसून नुकतेच सर्व्हेक्षण करून रुपये २३.१२ लाख ची योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

(२) योजना मंजुरीची प्रक्रिया सुरु असून त्यामध्ये अस्तित्वातील विहीरीवरून नवीन पाण्याची टाकी व नविन वितरण व्यवस्थेची कामे करून प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत (जि.वर्धा) भादोडा गावातील पुनर्वसितांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(४) ८७९२ (१०-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत (जि.वर्धा) पुनर्वसित गावातील कामे नियोजनाअभावी पूर्ण न झाल्याने भादोडा गावातील पुनर्वसितांना अपूऱ्या सोई-सुविधा मिळत असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावाची समस्या सोडविण्यासाठी निम्न वर्धा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भादोडा गावातील पुनर्वसितांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२३-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चापलवाडा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील मछली नाल्यावर कोल्हापूरी बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५) ८८१४ (१७-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चापलवाडा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील मछली नाल्यावर जलसंधारण विभागांतर्गत कोल्हापुरी बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे गावकऱ्यांनी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चापलवाडा येथील मछली नाल्यावर कोल्हापुरी बंधाऱ्याचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१८-०८-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

चापलवाडा ता.चार्मोशी, जि.गडचिरोली येथील मछली नाल्यावरील बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत गावकऱ्यांची लेखी तक्रार क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त नाही. तथापि, दिनांक २९/०४/२०२१ रोजीच्या लोकमत वृत्तपत्रात सदर बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतची बातमी प्रकाशित झाली होती.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्रकाशित बातमीच्या अनुषंगाने जिल्हा जलसंधारण अधिकारी, जलसंधारण अधिकारी, कंत्राटदार यांचे अभियंता, लोकमत देशोन्नती वृत्तपत्राचे पत्रकार, सरपंच, सदस्य व प्रकल्पालगतचे शेतकरी यांचे समक्ष मोकास्थळी पाहणी करण्यात आली. त्यादरम्यान बंधाऱ्याचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, बांधकाम साहित्यांचे चाचणी अहवाल दाखविण्यात आले.

मोकास्थळी पाहणीत उपस्थित लोकमत वृत्तपत्रामध्ये सदर बातमी प्रकाशित करणारे पत्रकार यांचे गैरसमज दूर करुन पूर्णपणे समाधान करण्यात आले. सदर पाहणीत बंधाऱ्याचे बांधकाम चांगल्या दर्जाचे असल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागांतर्गत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना विमा कवच लागू करण्याबाबत

**(६) ८८२० (१०-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागांतर्गत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांनी कोरोना योध्दा म्हणून कर्तव्य पार पाडत असताना त्यांना विमा कवच लागू करावा यासाठी राज्य अंगणवाडी कर्मचारी युनियन, वर्धा शाखा यांचेकडून दिनांक १७ मे, २०२१ रोजीपासून कामावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिल्याचे दिनांक ११ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना योध्दा म्हणून काम करताना जिल्ह्यातील २ अंगणवाडी सेविकांचा मृत्यू झाला असल्याने शासनाने सदर कुटुंबाला अद्यापही मोबदला दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोनाने मृत्यू झालेल्या अंगणवाडी सेविकांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२६-०७-२०२१)** : (१) हे खरे नाही.
(२) व (३) शासन निर्णय, वित्त विभागा दिनांक २९/०५/२०२० अन्वये कोविड विषयक कर्तव्य बजावत असताना कोविमुळे मृत्यू झालेल्या प्रकरणी रुपये ५०.०० लक्ष एवढे सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील श्रीमती. जानकी तुळशीराम भांगे व श्रीमती. विजया विठ्ठल काळे या २ अंगणवाडी सेविकांचा कोविड विषयक कर्तव्य बजावत असताना कोविडमुळे मृत्यू झालेला आहे. त्यापैकी श्रीमती जानकी तुळशीराम भांगे यांचे प्रकरणी महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १४/०५/२०२१ अन्वये रुपये ५०.०० लक्ष एवढे सानुग्रह सहाय्य मंजूर करण्यात आले असून त्यानुषंगाने सदर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच श्रीमती विजया विठ्ठल काळे यांचे प्रकरणी सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील घोट वनपरिक्षेत्रांतर्गत बुध्दविहार कोटरी या पर्यटन स्थळाच्या विकासकामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) ८८२७ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील घोट वनपरिक्षेत्रांतर्गत बुध्दविहार कोटरी या पर्यटन स्थळाच्या विकासकामाकरीता सन २०१८ मध्ये ७४ लाख २० हजार १२२ रूपये मंजूर केले असता सदर कामातील रकमेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गैरव्यवहार प्रकरणातील दोषी वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) होय.
(२) होय, सदर कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने श्री.शेखर नवनाथ तनपुरे, तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, परिक्षेत्र घोट, आलापल्ली वनविभाग यांच्यावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशीच्या अनुषंगाने दोषारोप पत्र बजावले असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना पूर्ववत लागू करणेबाबत

**(८) ८८३६ (१५-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबतचा शासन निर्णय तात्काळ रद्द घोषित करुन खाजगी शाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व

भविष्यनिर्वाह निधी योजना पूर्ववत लागू करण्याप्रकरणी राज्यातील महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद व इतर विविध शिक्षक संघटनांनी शासनास वारंवार निवेदन देवून उपोषण, आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ११/१२/२०२०, २२/१२/२०२० व २७/१२/२०२१ रोजी निवेदने पाठवून सदरहू महत्वाच्या विषयाबाबत तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील मागणीबाबत निर्णय घेवून निर्णयाची अंमलबजावणी करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

---

**प्रा. वर्षा गायकवाड (३०-०८-२०२१) :** (१) व (२) याबाबत मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक ११/१२/२०२० चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) या विषयासंदर्भात मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात दिनांक २६/६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी अहवाल शासनास सादर केला असून त्यातील शिफारशीवर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील बालकांच्या कुपोषणावर आळा घालण्याबाबत तसेच जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ८८४८ (१०-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात आरोग्य तपासणी सुरु असताना २४४१ बालके मध्यम तर ३७३ बालके तीव्र कुपोषित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले तसेच, ११४६ अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुपोषणावर आळा घालण्याबाबत तसेच, अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(११-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

विभागीय आयुक्त नाशिक यांच्या आदेशान्वये माहे मार्च-२०२१ अखेरीस सॅम-मॅम धडक शोध मोहिम राबविण्यात आली होती. यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या समन्वयाने नाशिक जिल्ह्यातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यात २४४१ बालके मध्यम कुपोषित तर ३७३ बालके तीव्र कुपोषित असल्याचे आढळून आलेली आहेत.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत २६ प्रकल्प असून ४७७६ अंगणवाडी केंद्र आहेत. मे, २०२१ अखेर रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी सेविका | ४७७६ | ४५२७ | २४९ |
| २ | मिनी अंगणवाडी सेविका | ५१० | ४२५ | ८५ |

(२) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१) ६ महिने ते ३ वर्षेवयोगटातील लाभार्थी व गरोदर स्तनदा माता यांना THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा माल नियमितपणे देण्यात येत आहे.

२) सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

३) आदिवासी भागात अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना चौरस आहार व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी, केळी सुध्दा देण्यात येत आहेत.

४) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली असून या ग्राम बालविकास केंद्रांमध्ये लाभार्थ्यांना तीन वेळचा अतिरीक्त आहार देण्यात येत आहे. ग्राम बालविकास केंद्रात SAM बालकांना औषध उपचार देवून त्यांना वैद्यकिय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मात्रानुसार EDNF देण्यात येते.

५) राज्यात पोषण अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पोषण अभियानांतर्गत जनजागृतीचे विविध कार्यक्रम घेण्यात येतात. सर्व अंगणवाडी सेविकांना स्मार्टफोन देण्यात आलेले आहेत स्मार्ट फोनव्दारे Real time monitoring अंगणवाडी सेवा देण्यात येत आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग व वैद्यकीय औषधी द्रव्य विभाग वगळता इतर विभागातील कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करु नये असा स्पष्ट उल्लेख असल्याने अंगणवाडी सेविकांची पदभरती करण्यात आलेली नव्हती. तसेच कोविड-१९ साथीच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देखील भरती प्रक्रिया राबविणेस अडचणी निर्माण होत होत्या. तथापि, याबाबत विभागाच्या दिनांक १२/०५/२०२१ च्या पत्रानुसार पदभरती करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रकल्पस्तरावर अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निधीचे नुकसान झाल्याबाबत

**(१०) ८८५३ (०९-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निधीसंबंधी झालेल्या नुकसानीचा चौकशी अहवाल सहाय्यक निबंधक यांनी जिल्हा उपनिबंधकांना सादर केल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी माहे एप्रिल, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात सुमारे १ कोटी १६ लाख ५७ हजार रुपयांच्या निधीचे नुकसान झाल्याचा निष्कर्ष काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीची जबाबदारी ११ संचालकांसह सचिवांवर निश्चित करण्यात आली असून त्यांच्याकडून कलम ५७(२) अन्वये वसुलीचे आदेशही देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नुकसान झालेल्या निधीची वसुली संबंधितांकडून करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-०८-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सहायक निबंधक तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे अहवालानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०५/०४/२०२१ च्या आदेशान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५३ व कलम ५७(२) मधील तरतुदीनुसार नुकसानीची रक्कम १ कोटी १६ लाख ५७ हजार रुपयांच्या निधीची ११ संचालकांसह सचिवांकडून वसूली करीता उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. “सदर आदेशाविरूध्द बाजार समितीचे संबंधित संचालक व सचिव यांनी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले आहे. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकारी यांचे दिनांक १५/०३/२०२१ रोजीचे आदेशास तात्पुरती स्थगिती दिली असून, सदर प्रकरणी अर्धन्यायिक प्राधिकारात सुनावणी सुरू आहे.”

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## महाज्योती संस्थेमार्फत (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था) मार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(११) ८८५९ (१५-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रामनिवास सिंह, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे महाज्योतीच्या (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था) संचालक मंडळाच्या मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत पीएचडी, एम.फिल.च्या संशोधक विद्यार्थ्यांना सारथी आणि बार्टीच्या धर्तीवर २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा ठराव करण्यात आला असून याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्याचे जाहीर करण्यात येवून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने राज्य अध्यक्ष, अॅग्रीकल्चर डॉक्टोरेटस असोसिएशनतर्फे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओबीसीचे ८० विद्यार्थी यूपीएससीच्या परिक्षेत मुलाखतीसाठी पात्र झाले असून महाज्योती संस्थेमध्ये नोंदणी होऊनही उक्त विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्राप्त झाले नाही, तसेच पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण १० हजार

युवकांना देण्यात येणार होते. तथापि, चार हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून केवळ १०० विद्यार्थी ऑनलाईन प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण देणारे शिक्षक अनुभवी नसून महाज्योती अंतर्गत प्रशिक्षणार्थींना टॅबलेट पुरविण्यात येणार असल्याचे सांगून टॅबलेट पुरविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाज्योती या स्वायत्त संस्थेला सन २०१९-२०२० करीता योजना राबविण्यासाठी १५५ कोटींचा निधी मंजूर असतानाही विविध योजनांच्या अंमलबजावणी अभावी निधी अखर्चित राहिल्याने त्यातील १२० कोटीचा निधी शासनाकडे पुन्हा वर्ग झाला असून सदरहू निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महाज्योतीला पुर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक नसल्यामुळे व अपुऱ्या मनुष्यबळामुळे संस्थेच्या कारभारावर मर्यादा आली असून उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय, क्र.महाज्यो-२०२०/प्र.क्र.५६/महामंडळे, दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयान्वये ३ नियमित पदे व बाह्य यंत्रणेद्वारे १७ पदे अशा एकूण २० पदांच्या आकृतिबंधास मान्यता दिली असून मंजूर आकृतिबंधातील उर्वरित पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उमेदवारांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत, शासनाकडे परत गेलेला निधी महाज्योती संस्थेकडे परत वर्ग करण्यात येऊन लाभार्थ्यांना लाभ मिळण्याबाबत तसेच व्यवस्थापकीय संचालक व मंजूर आकृतिबंधातील रिक्त पदे महाज्योती मार्फत भरण्याबाबत तसेच महाज्योतीद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या नियोजनातील सर्व त्रुटी विनाविलंब दूर करून भटक्या जाती-जमाती, विशेष मागासप्रवर्ग, ओबीसीना महाज्योतीच्या योजनांचा लाभ तसेच विद्यावेतन विनाविलंब अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०९-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३१/५/२०२१ रोजीच्या बैठकीत एप्रिल, २०१७ नंतर पीएच.डी. आणि एम.फील. साठी नोदंणी केलेल्या २०० विद्यार्थ्यांना व पीएच.डी. साठी ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक १८/०६/२०२१ रोजी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली आहे

(२) हे खरे नाही.

संघ लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या ६२ उमेदवारांच्या अर्जापैकी ५० पात्र विद्यार्थ्यांना एकरकमी रुपये २५०००/- अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

पोलीस भरती प्रशिक्षण साठी २७८४ अर्जापैकी २१४३ उमेदवार पात्र ठरले असून त्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकांची निवड करण्यात आली असून त्यांच्याव्दारे उमेदवारांना उत्कृष्ट प्रतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

टॅबलेट खरेदी करण्याची कार्यवाही GEM Portal व्दारे संस्थेकडे सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

महाज्योती या संस्थेस सन २०२१-२२ कालावधीकरीता वेतनेतर अनुदानापोटी रुपये ३५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी संस्थेमार्फत खर्च करण्यात आला आहे.

(४) महाज्योती संस्थेस दिनांक ०५/०८/२०२० च्या शासन निर्णयानुसार ३ नियमित पदे व १७ पदे बाहयस्त्रोव्दारे असे एकूण २० पदांना मान्यता आहे. त्यापैकी कपंनी सचिव, प्रकल्प संचालक ही पदे भरण्यात आली आहेत. तरी उर्वरीत पदे ही दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या मुलाखतीव्दारे संस्थेकडून भरण्यात येत आहेत.

(५) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग त्याचप्रमाणे इतर वंचित आणि दुर्लक्षित घटक यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी, महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHA JYOTI) या नावाची स्वायत्त संस्था दिनांक ८ ऑगस्ट २०१९ रोजी स्थापन करण्यात आली आहे.

तसेच महात्मा ज्योतीबा फुले प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या कंपनीच्या मेमोरेन्डम ऑफ असोसिएशन (Memorandum of Association) मधील उद्दिष्टासांठी संचालक मंडळाची स्थापना करण्यात आली असून संचालक मंडळाच्या मान्यतेने उपक्रम व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी प्रशासकीय विभागाकडून पुर्व सहमती घेण्याची आवश्यकता राहणार नसल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

महाज्योती करीता सन २०२१-२२ मध्ये अनुदानापोटी रुपये १५०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील घरेलू कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१२) ८८६५ (१७-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-२०१४ पासून घरकाम करणाऱ्या (मोलकरीण) कामगारांची कामगार आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत घरकाम करणाऱ्या कामगारांना प्रत्येकी १५०० रुपये देण्याची घोषणा करून त्यासाठी निधी मंजूर करण्यात आला असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सुमारे २५ लाख घरेलु कामगार असून त्यातील ४ लाख ७१ हजार कामगार हे महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणीकृत असल्याने त्यांना हा निधी मिळणार असून नोंदणीकृत नसलेल्या उर्वरित २० लाख घरेलु कामगार महिला या लाभापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर व औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरात लाखो घरेलू कामगार असून राज्यभरातून जवळपास लाखो घरेलू कामगार महिलांनी नोंदणीसाठी कामगार कल्याण मंडळाकडे अर्ज करून अनेक वर्षाचा कालावधी होऊनही त्यांची नोंदणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नोंदणीकृत असलेल्या व नसलेल्या घरेलु कामगार महिलांचा सर्व्हे करुन सर्वांना कोरोना काळात जाहीर केलेले पॅकेज देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही, २०११ पासून घरकाम करणाऱ्या (मोलकरीण) कामगारांची कामगार आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी आजतागायत सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळात नोव्हेंबर, २०११ पासून नोंदणी सुरु असून आजपर्यंत ४६६८२५ नोंदीत घरेलू कामगारांची संख्या आहे. शासन निर्णय क्र. घरेलू-१२२१/ प्र.क्र.४५/ काम-७अ, दिनांक ३०/०४/२०२१ अनुसार मंडळाकडे नोंदणी व नूतनीकरण झालेल्या घरेलू कामगारांसाठी पहिल्या टप्प्यात सक्रिय व जिवित नोंदणी असलेल्या एकूण १,०५,५०० घरेलू कामगारांना प्रत्येकी रुपये १५००/-प्रमाणे एकूण रुपये १५,८२,५०,०००/- (रुपये पंधरा कोटी ब्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार, रुपये १५००/- रक्कम थेट नोंदीत घरेलू कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

तसेच, दिनांक ४/०५/२०२१ रोजीच्या शासनाच्या पत्रान्वये दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या परंतु वार्षिक नुतनीकरण करु न शकलेल्या सर्व घरेलू कामगारांना दिनांक ३०/०४/२०२१ च्या शासन निर्णयानुसार रुपये १५००/- ची मदत देण्यास पात्र ठरविण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणी २०११ पासून सुरु असून मंडळाकडे ज्या घरेलू कामगार महिलांनी नोंदणीकरीता अर्ज केला आहे. त्या सर्व घरेलू कामगारांची नोंदणी त्या-त्या जिल्हा कार्यालयात करण्यात आली आहे. तसेच, ज्या घरेलू कामगारांची माहिती अद्ययावत नाही त्यांची माहिती अद्ययावत करण्याकरीता https://public.mlwb.in/public लिंक करण्याची कार्यवाही नियमातील तरतुदी तपासून करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी भागातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(१३) ८८८० (१५-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वांगण विहिरीतील दुर्गंधी व शेवाळ युक्त पाणी पिण्यास योग्य न राहिल्याने मधली वाडीतील ग्रामस्थांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील टाकीपठार येथील आपटे ग्रुप ग्रामपंचायतीमधील ३८ घरे असणाऱ्या २०० लोकवस्तीच्या मधली वाडीतील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गावालगतच्या खोल दरीत दोन विहिरी बांधल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे विंधण विहिरीचे पाणी दूषित झाले असून दूषित पाण्यामुळे साथीचे आजार उद्भवण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करीत असून शहापूर तालुक्यातील डोंगर पठार खोऱ्यातील वास्तव्यास असणाऱ्या आदिवासींना माहे एप्रिल, मे मध्ये जाणवत असलेली भीषण पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०२-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

सदरच्या दोन्ही विहिरी गावालगतच्या खोल दरीत असून शासनाच्या विविध योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या आहेत.
(३) अंशत: खरे आहे

तथापि, वांगण विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरत नाहीत. परंतु आपटे आणि सर्व पाड्यांकरीता स्वतंत्र विहिरी बांधण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ठिकाणची कायमस्वरुपी पाणी टंचाई दूर करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत (सध्याची जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीत) नळ पाणीपुरवठा योजना मंजूर असून प्रगतीत आहे.
(४) जल जीवन मिशन अंतर्गत सदर वाडीसाठी नळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केलेली आहे. तसेच उर्वरित पाणी टंचाई भासणाऱ्या गाव /पाड्यांकरीता ग्रीड योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे व पालघर जिल्हयातील खर्डी-टेंभा-वैतरणा-परळी-उज्जैनी-झाप हया रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१४) ८९६२ (१८-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्हयातील वाहतूक व्यवस्थेवरचा ताण कमी करण्यासाठी खर्डी-टेंभा-वैतरणा-परळी-उज्जैनी-झाप हया मार्गाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोडकसागर धरण ते परळीगाव या ६ किमीच्या रस्त्यासाठी रुपये ४ कोटी मंजूर असून उक्त ६ किमीच्या रस्त्यापैकी २ किमी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, परंतु पुढील ४ किमीवरील रस्त्याची जमीन वन विभागाच्या अख्यातरित येत असल्याने ह्या रस्त्याचे काम पिवळी-वैतरणा वन विभागाने बंद केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू महामार्गामुळे खर्डी ते परळी हे अंतर ६० किमीवरुन थेट २० किमी होणार असल्यामुळे ४० किमीचा अतिरिक्त प्रवास कमी होवून परिसरातील गावे थेट खर्डी रेल्वे स्थानकाशी जोडली जावून नागरिकांची शिक्षण, रोजगार, व्यापार, शहराकडे जाणे इत्यादीबाबतीत गैरसोय दूर होवून दळणवळण करणे नागरिकांना सुलभ होणार असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी सदरहू रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याच्या कामाकरीता येणाऱ्या अडचणी दूर करुन रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२३-०८-२०२१) :** (१), (२), व (३) होय.
(४) वन विभागाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या लांबीबाबत वन विभागाशी पाठपुरावा करून डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हा आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) ८९६४ (१०-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा आरोग्य विभागांतर्गत १७१२ मंजूर पदांपैकी १२१५ पदे भरण्यात आली असून ४९७ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांचा परिणाम जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेवर पडून उपचाराविना रुग्णांचे बळी जात असून पालघर जिल्ह्यातील रुग्णांना उपचारासाठी शेजारील गुजरात, सिल्वासा व मुंबई येथे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२५-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखलील रिक्त पदांच्या ५० टक्के पदभरतीस मा.मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली होती. त्यानसुार दिनांक २८/०२/२०२१ रोजीच्या पदभरती परिक्षेद्वारे विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यात आली असून उर्वरित सर्व रिक्त पदे भरण्याची मान्यता आता मा.मंत्रिमंडळाकडून मिळाल्याने पदभरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

उपलब्ध भरलेल्या पदांकरवी रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येत असून उपचाराअभावी रुग्णाचे बळी जात आहेत हे खरे नाही. तसेच केवळ अतिगंभीर रुग्णांना ठाणे, मुंबई इत्यादी ठिकाणी नेले जाते.

(३) होय, हे खरे आहे. आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एनआरसी कंपनीतील कामगारांची देणी देण्याबाबत

**(१६) ८९७३ (१७-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एनआरसी कंपनी माहे नोव्हेंबर, २००९ पासून बंद पडली असून कंपनीतील ४५०० कामगार बेरोजगार झाले असून कामगारांचे थकीत वेतन देण्याचा प्रश्न न्यायप्रविष्ट असताना एनआरसी कंपनीच्या कामगारांचा विरोध असतानाही अदानी ग्रुपने एनआरसी कंपनीच्या व्यवस्थापनाच्या मदतीने व पोलीस बळाचा वापर करुन वसाहतीमधील इमारतींवर बुलडोझर फिरवला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनआरसी कंपनी बंद पडली असून हजारो कामगारांची देणी अद्याप कंपनीने दिलेली नसल्यामुळे हक्काची देणी दिल्याशिवाय एनआरसी कंपनी विकण्यास कामगारांचा विरोध असतानाही कंपनीने ४४२ एकर जमिनीसह मालमत्तेची विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अदानी ग्रुपने महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय दहा झाडांची कत्तल करुन पाच बंगले पाडले असता कामगारांनी विरोध केल्यामुळे त्यांना बेकायदेशीररीत्या पोलीस ठाण्यात डांबून ठेवण्यात आले असून बेकायदा करण्यात आलेल्या कारवाईचा निषेध करण्यासाठी कामगारांनी एनआरसी कंपनीसमोर आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगारांच्या वेतनातून कपात केलेला कोट्यवधी रुपयांचा भरणा कंपनीने भरलेला नसताना मूळ रक्कम, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि सोसायटीचे कापलेले पैसेही दिले नसल्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करुन एनआरसी कंपनीकडून कामगारांची पुर्ण देणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०८-२०२१) :** (१) मे.एनआरसी लि. कंपनीमध्ये दिनांक १५/११/२००९ पासून टाळेबंदी सुरु झाली असून, त्यावेळी सदर आस्थापनेत ३३९७ कामगार/कर्मचारी कार्यरत होते. सदर कंपनीस वित्त पुरवठा करणाऱ्या पंजाब नॅशनल बॅंकेने त्यांची थकीत रक्कम मिळावी म्हणून मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे (National Company Law Tribunal) दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने न्यायाधिकरणाने दिनांक १३/०३/२०२० रोजी आदेश पारित करुन मे. अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि. यांनी दाखल केलेला Resolution Plan मंजूर केला आहे. सदर आदेशाविरुध्द कंपनीतील संघटना/कामगारांनी राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय प्राधिकरणासमोर अपील दाखल केले आहे.

विभागीय उपआयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून दिनांक २५/०२/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार एनआरसी कंपनीतील रहिवास मुक्त असलेल्या, रिकाम्या व पडिक इमारती या अतिधोकादायक स्थितीत असल्याने केवळ नागरिकांच्या जिवितास व वित्तहानीस नुकसान होवू नये म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सदर इमारत/ घर रिकामी करुन निष्काषित करणे बाबत नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि. कंपनी यांचेकडून एनआरसी कंपनीच्या पडीक व धोकादायक इमारती तसेच कामगार रहात नसलेल्या इमारती पाडण्याचे काम कायदेशीररीत्या करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत न्यायाधिकरणाच्या दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या आदेशास स्थगिती नसल्यामुळे, सदर आदेशानुसार कार्यवाही सुरु असल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे.

(२) सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (National Company Law Tribunal) यांचेकडे सुरु असून, न्यायाधिकरणाने दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि.यांनी दिनांक १०/०५/२०१९ रोजी दाखल केलेला Resolution Plan मान्य केला आहे. सदर योजनेनुसार न्यायाधिकरणाने कामगारांची देणी देण्याकरीता रुपये ३२.१६ कोटी मंजूर केलेले आहेत. याशिवाय मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि. व एन.आर.सी.मजदूर संघ यांच्यामध्ये दिनांक २१/०१/२०२०,

दिनांक ३१/०८/२०२० व दिनांक १५/०९/२०२० रोजी करार होवून अतिरिक्त रुपये ६८ कोटी अटी व शर्तीसह विशेष लाभ योजना म्हणून कामगारांची देणी देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार एकूण रुपये १०० कोटी कामगारांची देणी देण्याकरीता तरतूद केलेली आहे. सदरची संपूर्ण कार्यवाही राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने नियुक्त केलेल्या अंतरिम निर्णय व्यावसायिक (Interim Resolution Professional) यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दिनांक १८/०२/२०२१ व २१/०६/२०२१ रोजीच्या अहवालानुसार महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय सदर जमिनीवरील झाडांची कत्तल केली असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. खडकपाडा पोलीस स्टेशन, कल्याण यांचेकडून दिनांक १८/०२/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार याप्रकरणी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (National Company Law Tribunal) यांच्या दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या आदेशानुसार मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि. यांचे पडीक व कोणीही रहात नसलेल्या इमारतीचे तोडकाम दिनांक २०/०१/२०२१ रोजी सुरु असताना, सदर ठिकाणी काही लोकांनी एकत्र जमाव करुन सदरचे काम बंद पाडले होते. यासंदर्भात मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा. लि. यांचे तक्रारीनुसार संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयाचा तपास पोलीसांमार्फत चालू आहे. अदयापपर्यंत कोणालाही अटक केलेली नाही.

(४) एन.आर.सी. एम्प्लॉईज युनियन व ऑल इंडिया इंडस्ट्रीयल ॲण्ड जनरल वर्कर्स युनियन व १ कामगार यांनी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या आदेशाविरुध्द राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे अनुक्रमे अपील क्र.६४४/२०२०, ६६२/२०२० ४८/२०२१ दाखल केले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्टयातील पुर्णा बॅरेज २ (नेर धामणा प्रकल्प) या महत्वकांक्षी प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ८९९३ (१०-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्टयातील पुर्णा बॅरेज २ (नेर धामणा प्रकल्प) या महत्वकांक्षी प्रकल्पाला १८१.९९ कोटी रूपयांची प्रथम प्रशासकीय मान्यता सन २००८ मध्ये मिळाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८-२०१९ दरम्यान या प्रकल्पाची किंमत रुपये १८१.९९ कोटी वरुन रुपये ८८८.४३ कोटी इतकी झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळूनही आजपावेतो या प्रकल्पाची किंमत ७०० कोटीने वाढून १४ वर्षे होऊनही प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नसून पंप हाऊस व पी.डी.एम. हे कार्यान्वित झाले नाही, तसेच, पंप हाऊस व पी.डी.एम. कार्यान्वित न होण्यामागे संबंधित अधिकारी व सी.डी.ओ. या डिझाईन बनवणाऱ्या कंपनी दिरंगाई करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंप हाऊस व पी.डी.एम. ची कामे पुर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदार व कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदर प्रकल्प पुर्ण करणे संदर्भात शासनाचे धोरण काय आहे तसेच शासन व शेतकरी यांचे झालेल्या नुकसानीला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याकरीता चौकशी आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०४-०८-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) नविप्र (PDN) च्या संकल्पनास प्रादेशिक कार्यालयाची मंजुरी असून पंपगृहाचे सर्वसाधारण आराखडे, संकल्पचित्रे म.सं.सं. नाशिक यांचेकडून प्राप्त आहेत. तथापि, प्रकल्पस्थळ हे खारपाणपट्टयामध्ये असून येथील असाधारण

भूरचनेमुळे पायव्यासाठी आवश्यक धारण क्षमतेचा भूस्तर उपलब्ध होवु शकत नाही. या अडचणीमुळे पंपगृहाच्या प्रत्यक्ष बांधकामास विलंब होत आहे. उपसा यंत्रणेच्या योग्य परिचलनासाठी पंपगृह आणि नलिका वितरण प्रणाली परस्परपुरक असून त्यांचे आराखडे एकमेकावलंबी आहेत. त्यामुळे पंपगृह आणि नलिका वितरण प्रणालिचे बांधकाम एकत्रित करण्याचे नियोजन आहे. भूधारण क्षमतेच्या अडचणीवर मात करण्यासाठी पंपगृहाचे विविध पर्यायांचा अभ्यास प्रगतीपथावर आहे.

(५) उक्त प्रकरणी पंपगृह व नलिका वितरण प्रणाली बाधकामास तांत्रिक कारणास्तव विलंब झालेला असून यात दिरंगाई अथवा गैरव्यवहार झालेला नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, पुर्णा बॅरेज प्रकल्पाच्या मूळ निविदा कामाच्या चौकशी मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी केली असून संबंधित कंत्राटदार तसेच जबाबदार अधिकाऱ्यां विरुध्द गुन्हे (FIR) दाखल करण्यात आले आहेत. प्रकल्पाची पूर्ण साठा क्षमता जुन, २०१९ अखेरीस निर्माण झालेली असून फक्त उपसा यंत्रणा व नलिका वितरण प्रणालिची कामे शिल्लक आहेत. उर्वरीत कामासह जुन, २०२३ अखेर प्रकल्प पूर्णत्वाचे नियोजन आहे.

(६) बॅरेज घटकाची संकल्पने, सन २०१५ ते १७ दरम्यान महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी प्रकल्पाच्या कामास दिलेली स्थगिती, पंपगृहाच्या पायव्याच्या भुस्तरातील अडचणीमुळे संकल्पन व नकाशे मंजुरी मधील अडचणी, इत्यादी मुळे विलंब झाला आहे.

---

## नागपूर शहरात व्यवसायिक मालमत्तेच्या मूल्यांचा दर कमी करून गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(१८) ९०२८ (१५-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात व्यावसायिक मालमत्ता कर चुकीच्या प्रकारे रुपये २.५० लाखाहून रुपये ७०,००० करुन मालमत्तेच्या मूल्यांचा दर कमी करून

गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनेक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून नियमबाह्य पध्दतीने मालमत्तेचे नामांतरण व विभागणी करून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मालमत्ताधारकांनी केलेल्या लेखी तक्रारीचा विचार करून लोकप्रतिनिधींनी आयुक्तांकडे लेखी तक्रार, निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मालमत्ता करात गैरव्यवहार करून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडविल्या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) व (२) नागपूर शहरातील वार्ड क्र.०६ मधील मालमत्ता क्र.६९४/८/अ बाबत, तेथील कर संग्राहक यांचे युजर आयडी मधून गैरप्रकारे मालमत्ता कर कमी करण्याचा प्रयत्न झाल्याचे, नोव्हेंबर, २०२० मध्ये निदर्शनास आले होते. यामध्ये सकृतदर्शनी आढळून आलेल्या संबंधित कर्मचाऱ्याकडून प्राप्त खुलासा समाधानकारक नसल्याने, संबंधितास निलंबित करण्यात आलेले होते व याअनुषंगाने सायबर पोलीस विभागात गुन्हाही दाखल करण्यात आलेला आहे. पुढील चौकशी पोलीस विभागाकडून सुरु असून, संबंधितांविरोधात विभागीय चौकशी सुरु आहे.

याशिवाय या प्रकरणात, महानगरपालिका सभागृहाने चौकशी समिती नियुक्त केली असून, या समितीच्या अहवालाअंती आर्थिक नुकसान झाले आहे अथवा कसे? याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास येईल.
(३) या प्रकरणात मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका याचेद्वारा चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(४) व (५) या प्रकरणात पोलीस विभागाच्या सायबर सेल, महानगरपालिका सभागृहाच्या गठीत समितीकडून व अतिरिक्त आयुक्त, नागपूर मनपा यांचे द्वारा चौकशी सुरु आहे.

प्राथमिक स्तरावर दोषी आढळून आलेल्या ०२ कर्मचाऱ्यांच्या विरोधात विभागीय चौकशी सुरु असून, ०५ कर्मचाऱ्यांच्या विरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. विभागीय चौकशीअंती घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## राज्यातील दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना लॉकडाऊन काळात मोफत धान्य वितरण करण्याबाबत

**(१९) ९०३१ (१५-०६-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊन लागू करताना सर्वसामान्यांचे हाल होऊ नये याकरीता दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला, परंतु सदरहू निर्णयाला १५ दिवस होवूनही अद्याप सर्वसामान्यांना मोफत धान्य पुरवठा करण्यात आला नसल्याची माहिती दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत धान्य न मिळाल्याने हातावर पोट असणाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने धान्य वितरणाच्या पुर्ण नियोजनाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच, अद्यापपर्यंत धान्याचे नियोजन न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वितरण योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२३-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावास प्रतिबंध व्हावा याकरीता लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर दिनांक १६/०४/२०२१ च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्यास पात्र असलेल्या लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजनेच्या व प्राधान्य कुटूंबातील लाभार्थ्यांना १ महिन्याकरीता मोफत अन्नधान्य वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर पत्रानुसार पात्र लाभार्थ्यांना माहे एप्रिल, २०२१ किंवा माहे मे, २०२१ यापैकी एका महिन्याचे अन्नधान्य मोफत घेण्याचा पर्याय देण्यात आला होता.त्यानुसार लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरीत करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्राहक संरक्षण मंचाकडून ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारी विनाविलंब निकालात काढण्याबाबत

**(२०) ९०४३ (१५-०६-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्राहक तक्रारीशी संबंधित प्रलंबित तक्रारींमध्ये महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर असून बिहार राज्यामध्ये तक्रारींचा निपटारा महाराष्ट्रापेक्षा जलदगतीने होत असल्याने ग्राहकांशी संबंधित प्रशासनाबाबत शासनस्तरावर

तात्काळ योग्य आदेश देण्याची आवश्यकता असल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांनी तात्काळ योग्य ते आदेश द्यावेत, अन्यथा याबाबत मा.उच्च न्यायालयात दाद मागावी लागेल, असा इशारा ग्राहक पंचायत, महाराष्ट्र प्रांत पदाधिकाऱ्यांनी एका निवेदनाद्वारे शासनाला माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ग्राहकांना संरक्षण मिळण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या ग्राहक तक्रार निवारण न्याय मंचात ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण दोन टक्क्यांहून कमी असल्याचे निदर्शनास आले असून माहे मार्च, २०२१ च्या सुरुवातीच्या सुमारापर्यंत राज्यात सुमारे २५ हजार प्रकरणांचा निपटारा झाला नसल्याचे स्पष्ट झाल्याने ग्राहक न्यायापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग परिक्रमा खंडपीठ नागपूर अंतर्गत येणारे विदर्भातील १२ जिल्हा ग्राहक आयोग कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे पूर्णत: बंद असल्याने प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत असताना ग्राहकांनी ऑनलाईन कामकाज घेण्यासंदर्भात मागणी करूनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, हिंगोली या जिल्ह्यातील ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्षपद तर अमरावती, यवतमाळ, गोंदिया, गडचिरोली, रायगड, रत्नागिरी, हिंगोली येथे प्रत्येकी एक आणि मुंबई व सिंधुदुर्ग येथे प्रत्येकी दोन अशा अकरा जिल्हा ग्राहक न्यायालयात सदस्य पदे रिक्त असून राज्यात अस्तित्वात असलेल्या राज्य आयोग खंडपीठे आणि जिल्हा न्यायालये अशा एकूण ४३ ग्राहक न्यायालयांपैकी २७ न्यायालयात प्रबंधक पदे रिक्त असून उक्त कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने ग्राहकांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त ग्राहक संरक्षण कायद्याची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने तसेच आयोगातील नियुक्ती प्रक्रिया पूर्ण न झाल्याने ४० हजारापेक्षा अधिक तक्रारी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहक न्यायापासून वंचित राहू नयेत यासाठी ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारी विनाविलंब निकालात काढण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१६-०९-२०२१) :** (१) ग्राहक पंचायत, पदाधिकाऱ्यांचे निवेदन विभागास प्राप्त नाही. तथापि, सदस्य, राज्य ग्राहक संरक्षण परिषद यांचे अशा आशयाचे निवेदन प्राप्त आहे.

(२) कन्फोनेट प्रणालीव्दारे प्राप्त आकडेवारीनुसार माहे मार्च २०२१ अखेर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडील निवारण झालेल्या तक्रारींचे प्रमाण ४२ टक्के एवढे असून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आायेगाकडील निवारण झालेल्या तक्रारींचे प्रमाण ७८ टक्के आहे.

(३) पक्षकारांनी मागणी केल्यास आयोगाकडून ऑनलाईन कामकाज केले जाते. तथापि, अशी मागणी विदर्भातील कोणत्याही जिल्हा आयोगास प्राप्त झालेली नाही.

(४) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांची अनुक्रमे १२ व १३ अशी एकूण २५ पदे रिक्त आहेत. जिल्हा आयोगासाठी प्रबंधक गट-ब, राजपत्रित संवर्गाची ४० पदे मंजूर असून त्यापैकी २७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरावयाची कार्यवाही सुरु आहे.

(५) माहे जुलै २०२१ अखेर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडील प्रलंबित ग्राहक तक्रारींची संख्या ४९,४२३ तर राज्यातील एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील प्रलंबित ग्राहक तक्रारींची संख्या ६८,०७८ एवढी आहे.

(६) राज्य आयोग व जिल्हा आयोगातील अध्यक्ष व सदस्यांची ३३ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०२/०२/२०२१ च्या जाहिरातीव्दारे इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी अध्यक्ष, राज्य आयोग या पदावर दिनांक ०४/०६/२०२१ च्या अधिसूचनेन्वये नियमित नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्य, राज्य आयोग या पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती निवड समितीने घेतल्या असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे निकाल जाहीर करता आलेला नाही. जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य अशी एकूण २५

रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाईन परिक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रबंधक, गट-ब (राजपत्रित) संवर्गाची ४० पदे मंजूर असून त्यामधील सरळसेवेने भरावयाच्या २० पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक १५/०६/२०२० च्या पत्रान्वये मागणीपत्र सादर केले आहे. पदोन्नती कोट्यातील ७ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात येत आहे.

---

## राज्यातील शासकीय कार्यालयातील "लिपिक" व "शिपाई" संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व पदभरतीबाबत

**(२१) ९०५१ (१०-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वित्त विभागाने गट "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने लिपिक संवर्गात भरावयाच्या पदांची संख्या २५ टक्क्यावरून ५० टक्केपर्यंत वाढविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार सरळसेवेत भरावयाच्या ७५ टक्के पदांवर परिणाम होऊन ती २५ टक्क्यांनी अतिरिक्त झाल्याने राज्यातील सर्व विभागातील कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदे अतिरिक्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी लागू केल्यापासून कोणत्याही विभागात सरळसेवा भरती ही २५ टक्के अतिरिक्त झाल्याने कनिष्ठ लिपिक पदांची भरती करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सरळसेवा कनिष्ठ लिपिक संवर्गातील २५ टक्के पदे कमी झाल्याने अनेक विद्यार्थी नोकरीपासून वंचित राहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सदर शासन निर्णयात शिपाई संवर्गातील रिक्त असलेली २५ टक्के पदे प्राधान्याने निरसित करण्याबाबत अवगत केले असून याव्दारे शिपाई संवर्ग संपुष्टात आणायचे शासनाचे धोरण आहे काय,

(६) असल्यास, कनिष्ठ लिपिक संवर्गावर अन्यायी होणारा शासन निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०६-०८-२०२१) :** (१) होय.

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या गट-क मधील श्रेणीवर्धनासाठी, गट "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने गट-क संवर्गात भरावयाच्या पदांची मर्यादा २५ टक्क्यावरुन ५० टक्केपर्यंत वाढविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) नाही.

मंजूर पदांच्या संख्येवर सदर टक्केवारी लावण्यात आली आहे. त्यामुळे सरळसेवेने भरावयाच्या ७५ % पदांऐवजी ती ५०:५० या गुणोत्तराने सरळसेवा व पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत.

(३) सुधारीत गुणोत्तरानुसार सरळसेवेच्या ५० टक्के कोट्यातील रिक्त झालेल्या कनिष्ठ लिपिक पदांची भरती करता येईल.

(४) लिपिक संवर्गातील सरळसेवेची पदे कमी झाली तरी त्या संवर्गातील एकूण पदसंख्येत घट झालेली नाही. या निर्णयामुळे गट-ड मधील कर्मचाऱ्यांकरीता पदोन्नती संधीमध्ये वाढ झाली आहे.

(५) नाही.

शासनाच्या कार्यपध्दतीतील माहिती तंत्रज्ञान व ई ऑफिस प्रणालीच्या वाढत्या वापरामुळे काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळाच्या मागणीतील बदल व परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबी विचारात घेऊन शिपाई संवर्गातील मंजूर पदे कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

(६) प्रश्न भाग क्र.१ व ५ येथे नमूद वस्तुस्थिती विचारात घेता हा शासन निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) तालुक्यातील रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव या संस्थेने शासन निधीचा अपहार केल्याबाबत

**(२२) ९०५४ (१०-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव संचलित मौजे सारोळा (धावज्याचीवाडी) अंतर्गत अंबळाचे बरड (ता.केज, जि.बीड) येथे संस्थेच्या मालकीचे गट नं.२१/ई सामाजिक सभागृह (जनोपयोगी) बांधणे या कामात प्रतिष्ठानने खोटे दस्तऐवज सादर करुन शासनाची फसवणूक करुन शासन निधीचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव यांनी रुपये १०० च्या बॉन्डवर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा कर्ज संस्थेकडे नाही असे दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी खोटे शपथपत्र सादर करुन अध्यक्ष, रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव यांनी सामाजिक सभागृह बांधकाम नसताना दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी सभागृह हस्तांतरित केले तसेच ताबा पावती आहे असे दाखवून शासनाकडून उर्वरित निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव यांच्याकडे दिनांक १ सप्टेंबर, २०२० रोजी तलाठी सारुळ ता.केज यांच्या ७/१२ वर छेडछाड करुन रुपये १ कोटी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या केज शाखेचा बोजा दाखवला नाही, तसेच रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव या संस्थेच्या घटनेतील उद्देशामध्ये सामाजिक सभागृह बांधणे, मंगल कार्यालय बांधकाम करणे अथवा या कार्यासाठी निधी स्वीकारणे असा उल्लेख नमूद नाही, प्रशासकीय आदेशानुसार हे काम सर्व्हे नं.२१ ग्रामपंचायत सारुळ, ता.केज यांच्या हद्दीत तसेच केज तालुक्याच्या हद्दीत देखील केलेले नसतानाही संबंधित अधिकाऱ्याने आर्थिक संगनमताने काम पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव या संस्थेवर कारवाई करुन निधीची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१७-०८-२०२१) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय, हे खरे आहे.
(४) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम हा पूर्णत: केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी संबंधित "जिल्हा प्राधिकरण" यांच्यामार्फत करण्यात येते. त्यानुसार रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव संचलित मौजे सारोळा (धावज्याचीवाडी) अंतर्गत अबंळाचे बरड (ता.केज, जि.बीड) येथे संस्थेच्या मालकीचे गट नं.२१/ई या जागेवर सामाजिक सभागृह (जनोपयोगी) बांधणे या कामासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी "जिल्हा प्राधिकरण" म्हणून खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला रुपये १८.७१ लक्ष एवढा निधी परत करण्याच्या तसेच संबंधितांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना "कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र. २ जिल्हा परिषद, बीड" यांना दिलेल्या आहेत. तसेच "मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड" यांनाही संबंधितास आपल्या स्तरावरुन सूचित करण्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकांतर्गत येणाऱ्या कस्तुरबा गांधी रुग्णालय व भरतीया रूग्णालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) ९०५७ (११-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकांतर्गत येणाऱ्या कस्तुरबा गांधी रूग्णालय व भारतीय रूग्णालय हे गत ६० वर्षापासून कार्यरत असून उक्त दोन्ही

रूग्णालयांची निधी अभावी व दुर्लक्ष केल्यामुळे दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रूग्णालयाने गत २ वर्षांतील कोविड-१९ ह्या साथीच्या काळामध्ये रूग्णांना अविरत सेवा दिली असून दोन्ही रूग्णालयांना वैद्यकियदृष्ट्या अत्याधुनिक करण्याकरीता विशेष निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही रुग्णालयांची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१), (२), (३) व (४) अकोला शहरातील कस्तुरबा गांधी रुग्णालय सन १९६८-६९ मध्ये आणि भरतीया रुग्णालय सन १९७२ मध्ये कार्यरत झालेले असून, ही दोन्ही रुग्णालये अकोला महानगरपालिकेच्या मालकीची आहेत.

यापैकी कस्तुरबा गांधी रुग्णालयाची निधी अभावी दुरुवस्था झाल्याची वस्तुस्थिती आहे तथापि, त्याकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष झालेले नाही.

यास्तव महानगरपालिकेने कस्तुरबा गांधी रुग्णालयाच्या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २००५-२००६ मध्ये रुपये १० लक्ष आणि सन २०११-१२ मध्ये रुपये ०६ लक्ष आणि भरतीया रुग्णालयाच्या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१५-२०१६ मध्ये रुपये ०७ लक्ष आणि सन २०१८-२०१९ मध्ये रुपये २.३५ लक्ष इतका निधी खर्च केलेला आहे व या दोन्ही इमारती आज रोजी वापरात आहेत.

सद्य:स्थितीत कस्तुरबा गांधी महिला रुग्णालयाचे जनरल वार्ड व स्टाफ रुमचे छत मोडकळीस आल्यामुळे आंतररुग्ण सेवा बंद आहे. रुग्णालयाच्या इतर सेवा सुरु आहेत. तसेच यास्तव, नागरी दलित वस्ती सुधारणेअंतर्गत नवीन ३० खाटांचे कस्तुरबा गांधी महिला रुग्णालय बांधकामाचा प्रस्ताव, जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु असल्याचे, अकोला महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## मुंबई येथे मराठी भाषा भवन उभारण्याबाबत

**(२४) ९०८८ (०९-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ६५६० ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्याची बाब अनेक वर्षांपासून शासनाच्या विचाराधीन असून मराठी भाषा भवन उभारण्यासाठी जागेची उपलब्धता व अन्य बाबींसाठी विचार करुन निर्णय घेण्यासाठी मराठी भाषा विभागाने दिनांक ३० जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मराठी भाषा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास अद्यापही सादर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने अहवाल सादर केला नसल्यास, मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्याबाबत कोणता निर्णय घेतला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे. त्यानुषंगाने अनेक वर्षापासून शासनाच्या विचाराधीन असलेली मराठी भाषा भवन उभारण्याची बाब लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२४-०६-२०२१) :** (१) होय.

(२) दिनांक २४/०३/२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये “मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारणीकरीता गिरगाव, जवाहर भवन, चर्नी रोड, मुंबई शहर येथील रिक्त भूखंड विनामोबदला मराठी भाषा विभागास उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री.पी.व्ही.हरदास समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२५) ९०९६ (१२-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, अॅड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७१४५ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या बांधवांना जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळावे याकरीता श्री.पी.व्ही. हरदास, माजी न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाचा अभ्यास करुन अहवालातील शिफारशींसंदर्भात अभिप्राय देण्याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय, सामाजिक न्याय व इतर मागास बहुजन कल्याण या विभागांना पाठविण्यात आला होता, सदर प्रस्तावावर विधी व न्याय तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले असून सामाजिक न्याय विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत मा.आदिवासी विकास मंत्री यांनी तारांकित प्रश्नाला उत्तर देतांना यासंदर्भात २ महिन्यात कार्यवाही करण्याचे आश्वासन देवूनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री.पी.व्ही. हरदास समितीच्या अहवालाची सकारात्मकरीत्या अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. के.सी.पाडवी (२५-०८-२०२१) :** (१), (२) व (३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या श्री पी. व्ही. हरदास, माजी न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या

अहवालातील शिफारशीबाबतचे सामाजिक न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.विधी व न्याय विभाग व सामाजिक न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेवून सदर समितीच्या अहवालातील शिफारशींबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता सदर अहवालातील १४ शिफारशी मान्य करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक ६ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले असून सदर शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात केंद्र शासनाच्या नव्या कामगार कायद्यास विरोध होत असल्याबाबत

**(२६) ९११२ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ६६५२ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नव्या कामगार कायद्याची राज्यात अंमलबजावणी केल्यास कामगार कपात, टाळेबंदी किंवा कारखाना बंद करण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागेल त्याच प्रमाणे नाकरीतील शाश्वतीचा कायम (पर्मनंट) शब्दही नव्या कायद्याने हद्दपार केल्याने कोणाला केव्हाही कामावरुन काढण्याचे सर्वाधिकार, उद्योजक, कारखानदारांना मिळणार असल्याने कामगारांच्या अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची भिती राज्याच्या कामगार विभागाने व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने कामगार कायद्यातील २९ तरतूदी एकत्रित करून ४ संहिता तयार केलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या या नव्या संहिता राज्यात लागू करण्यापुर्वी संबंधित घटकांशी, विशेषत: कामगार संघटनांशी चर्चा करून संबंधितांची मते विचारात घेऊन व राज्य शासनाच्या अखत्यारितील अधिकार लक्षात घेऊन सदर संहिता अंमलात आणण्यासाठी

नियमांचे प्रारुप प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/सूचना विचारात घेऊन कामगार हिताचे संरक्षण होऊन उद्योगांना देखील चालना मिळेल असे नियम करण्याची सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, सदर चार कामगार संहितांबाबत राज्यात विरोध वाढत असल्याने शासनाने त्यांच्या अंमलबजावणी प्रकरणी भूमिका स्पष्ट करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र शासनाने २९ कामगार कायद्यातील तरतूदी एकत्रित करून खालील ४ संहिता तयार केलेल्या आहेत.

१) वेतन संहिता
२) औद्योगिक संबंध संहिता
३) सामाजिक सुरक्षा संहिता
४) व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता

वरील चारही संहितांच्या अनुषंगाने नियमांचे प्रारूप विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्याची कार्यवाही अद्याप सुरू आहे.
(३) केंद्र शासनाने संसदेत पारित केलेल्या चार कामगार संहितांबाबत संबंधित घटकांची (Stake Holders) मते जाणून घेऊन सदर संहितांच्या अंमलबजावणीबाबतचा निर्णय घेण्याची शासनाची भूमिका असून त्यानुसार दिनांक २०/१०/२०२० रोजी राज्यातील प्रमुख कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे. याप्रकरणी अधिक चर्चा करून शासनाची भूमिका स्पष्ट करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे गुहागर (जि.रत्नागिरी) येथील नियोजित मँगो हेरिटेज गृह प्रकल्पाबाबत

**(२७) ९११५ (१८-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुहागर (जि.रत्नागिरी) हम रस्त्यालगत सर्व्हे नंबर १२८/क हिस्सा क्र.३ येथील अंदाजे ८.१७ एकर भूखंडावर नियोजित मँगो हेरिटेज गृह प्रकल्प उभारण्यात आला असून सदर गृह प्रकल्पाच्या विकासकाने रेखांकनात दर्शवलेली खुली जागा, अंतर्गत रस्ता व गटारे अटीनुसार विकसित करुन नगरपंचायत, गृहागर यांचेकडे हस्तांतरीत केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियोजित गृह प्रकल्पाचा भुभाग हा नैसर्गिक उतार असणारा भूभाग असून पावसाळ्यात विकासकांनी निर्माण केलेला अंतर्गत व पोहोच रस्ता तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे मार्ग मोठ्या प्रमाणात बाधित व नुकसानग्रस्त झाल्याने परिसरातील नागरीकांना भूखंडाचा विकास करणे अशक्य झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मँगो हेरिटेज गृह प्रकल्पांतर्गत पक्क्या रस्त्याची पुनर्बांधणी करुन नैसर्गिकरित्या पाणी वाहुन जाणारे मार्ग खुले करण्याबाबत तसेच रस्त्यावर पथदिवे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०७-२०२१)** : (१) मौजे गुहागर येथील सर्व्हे क्र.१२८/३ या रेखांकनामध्ये एकाही भुखंडास मँगो व्हिलेजच्या नावाने निवासी भोगवटा प्रमाणपत्र दिले नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

मौजे गुहागर येथील सर्व्हे क्र.१२८/३ मधील एकूण क्षेत्रापैकी विकासकाखालील २५१०० चौ.मी. या क्षेत्रासाठी गुहागर नगरपंचायतीमार्फत दिनांक २९/०६/२०१४ रोजी अंतिम रेखांकन परवानगी देण्यात आली आहे.

त्यानुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार विकासकाने सदर रेखांकनात कच्च्या स्वरुपाचा रस्ता व पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी चर मारल्याचे दिसून येत असल्याचे जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयाने कळविले आहे.

(२) खुल्या जागेवरील भुखंडाची नगरपंचायतीमार्फत पहाणी केली असता कोठेही पावसाचे पाणी साचत नसल्याची बाब निदर्शनास आली असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धमदीटोला (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत

**(२८) ९१२० (१५-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धमदीटोला (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) गावात पिण्याच्या पाण्याची सोय नाही, तसेच गावात असलेल्या बोअरवेलमधील गढूळ पाणी प्याल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत असून गावात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत नागरिकांनी तक्रारी करुनही गट ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धमदीटोला या आदिवासी गावास शुध्द पिण्याचे पाण्याचा पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धमदीटोला गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०५-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांनी धमदीटोला या गावात सौरऊर्जेवर आधारीत नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची विनंती केली आहे.

(४) धमदीटोला (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) गावात ग्रामपंचायतमार्फत सार्वजनिक विहिरीत इनवेल बोअर घेऊन तातडीने पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच सदर गावात नळ पाणीपुरवठा योजना घेण्याकरीता सदर गावाचा समावेश जल जीवन मिशनच्या गावकृती आराखड्यात करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील महानगरपलिकेच्या विहिरींचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(२९) ९१२२ (११-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात महानगरपालिकेच्या ६६६ विहिरी असून यापैकी ५० टक्के विहिरींना अक्षरश: कचरा कुंड्याचे स्वरुप प्राप्त झाल्यामुळे केवळ ३० विहिरीचे पाणी सद्य:स्थितीत पिण्यायोग्य आहे व त्यामुळे शहराला पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष पसरल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहराला पाणी टंचाई होऊ नये म्हणून उक्त विहिरींचे पुनरुज्जीवन करुन पाण्याचा महत्वपुर्ण स्त्रोत वापरात आणण्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१), (२) व (३) नागपूर शहरात एकूण ८५४ सार्वजनिक उघड्या विहिरी असून, यापैकी ५०% विहिरींना कचरा कुंड्यांचे स्वरुप प्राप्त झाले आहे, ही बाब खरी नाही.

उपरोक्त ८५४ पैकी ५४९ विहिरीच्या पाण्याच्या नमुन्याची तपासणी करण्यात आलेली असून, ५४९ पैकी ०५ विहिरीच्या पाण्याचे नमुने पिण्यास योग्य आढळून आले आहेत व ५४४ विहिरीच्या पाण्याचे नमुने पिण्यास अयोग्य आढळून आले आहेत.

या सार्वजनिक विहिरींची नागपूर महानगरपालिकेमार्फत नियमित साफसफाई केली जात आहे. याअंतर्गत सन २०१९-२० मध्ये ५०२ आणि सन २०२१-२२ मध्ये ११९ विहीरीमधील गाळ काढून विहिरी स्वच्छ करण्यात आलेल्या आहेत. तर सध्या २९ विहिरी स्वच्छ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

स्वच्छ करण्यात आलेल्या विहिरीपैकी ३२१ विहिरीवर विद्युत पंप बसविण्यात आलेले असून, या पाण्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी नागरिक करीत आहेत.

नागपूर शहरात जवळपास ३९०० कि.मी. जलवाहिन्याचे जाळे अस्तित्वात आहे. त्याद्वारे दररोज नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे.

ज्या ठिकाणी नळाद्वारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा होत नाही, अशा भागात टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो आहे.

---

## भूगाव (ता.जि.वर्धा) येथील मे.उत्तम गल्वा मेटालिक्स लि. या केमिकल कंपनीमध्ये स्फोट झाल्याबाबत

**(३०) ९१५० (१८-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.उत्तम गॅल्वा मेटालिक्स लिमिटेड, बरबडी, भुगांव लिंक रोड (जि.वर्धा) या कारखान्यात झालेल्या अपघाताची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून कारखान्याच्या

भोगवटादार व व्यवस्थापकाविरुध्द मा.मुख्य दंडाधिकारी, वर्धा यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दोन फौजदारी खटल्यांच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(२) असल्यास, मृत कामगार श्री.अभिषेक भैमीक यांच्या वारसास नोकरी देण्याचा निर्णय घेतला असून मृत कामगार राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्यामुळे त्याच्या वारसास निवृत्तीवेतन मिळण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, मृत इंजिनियर श्री.श्यामकिशोर पाल यांच्या वारसास रुपये २० लाख नुकसान भरपाई तसेच त्यांच्या पत्नीस योग्यतेप्रमाणे प्रति माह रूपये २५ हजार पगाराच्या नोकरीवर सामावून घेण्याबाबत व मुलाचा १ ली ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणाचा खर्च तसेच त्यांच्या वारसास कारखान्यानी घेतलेली वर्कमन पॉलिसी अंतर्गत देखील नुकसान भरपाई देणार असल्याचे व्यवस्थापनाने कळविले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) तसेच, मृत कामगार श्री.मनोज कुमार यादव यांच्या वारसास रुपये १ लक्ष सानुग्रह अनुदान आणि रुपये ५० लक्ष नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापनाने कळविले असून त्यांच्या वारसास कारखान्यानी घेतलेली GPA (Group Personal Accident) पॉलिसी अन्वये नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मे.उत्तम गॅल्वा मेटालिक्स लिमिटेड या कारखान्यात मृत पावलेल्या कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत करण्याबाबत व नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-०८-२०२१) :** (१) मे.उत्तम गॅल्वा मेटालिक्स लि., या कारखान्याच्या भोगवटादार व व्यवस्थापकाविरूध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा यांच्या न्यायालयात दिनांक २४/०२/२०२१ रोजी दोन खटले दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण सद्य:स्थितीत मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(२) मृत कामगार श्री.अभिषेक देबदास भैमीक हा अविवाहीत होता व त्याची वारसदार असलेली आई ही वृध्द असल्याने नोकरीची मागणी करण्यात आलेली नाही.

सदर मृत कामगाराच्या आईस कारखाना व्यवस्थापनाकडून रुपये ११.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले असून तसेच मृत कामगार हा राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्यामुळे त्यांच्या कायदेशीर वारसांस लाभ मिळण्याकरीता कारखाना व्यवस्थापनाने राज्य कामगार विमा योजना या कार्यालयात अर्ज केलेला असून पाठपुरावा सुरू आहे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत मृत कामगारांच्या वारसास पुढीलप्रमाणे सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई मिळवून देण्यात आली आहे.

मृत इजिनियर श्री.श्यामकिशोर ओमप्रकाश पाल, यांच्या वडिलांच्या व पत्नीच्या नावे अनुक्रमे बँक ऑफ बडोदा आणि स्टेट बँक ऑफ इंडिया येथे प्रत्येकी रुपये १०.०० लक्ष ची दिनांक ०९/०६/२०२१ व दिनांक २१/०५/२०२१ रोजी मुदत ठेव जमा करण्यात आलेली आहे.

मृत कामगार श्री.पाल यांच्या पत्नीस सदर कारखान्यात दिनांक १४/०४/२०२१ रोजी रुपये २५,०००/- मासिक वेतनावर नोकरीत सामावून घेण्यात आले असून मृत कामगाराचे अपत्य लहान असल्यामुळे तो शिक्षणायोग्य झाल्यानंतर कारखान्याच्या शाळेमध्ये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत मोफत शिक्षण कारखाना व्यवस्थापनामार्फत करण्यात येणार आहे.

(४) मृत कामगार श्री.मनोजकुमार यादव यांच्या वारसास रुपये १.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान दिनांक ०६/०२/२०२१ रोजी देण्यात आले आहे. तसेच मृत कामगारांच्या पत्नी, मुलगी व मुलगा यांच्या खात्यात अनुक्रमे रुपये ३०.०० लक्ष, रुपये १०.०० लक्ष आणि रुपये १०.०० लक्ष असे एकूण रुपये ५०.०० लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे. तसेच कारखाना व्यवस्थापनाने GPA (Group Personal Accident) पॉलिसी अन्वये मिळालेली एकूण रक्कम रुपये १९,९३,३२०/- मृत कामगार श्री.यादव यांच्या वारसास देण्यात आली असून मृत कामगार श्री.यादव यांच्या पत्नीने अनुकंपा तत्वावर मिळत असलेली नोकरी करण्यास इच्छुक नसल्याचे व्यवस्थापनास लेखी कळविले आहे.

(५) मे.उत्तम गॅल्वा मेटालिक्स लि., या कारखान्यात झालेल्या स्फोटाच्या अनुषंगाने उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नागपूर आणि उप संचालक तथा प्रभारी सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, अकोला यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून मृत पावलेल्या कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत व नोकरीत सामावून घेण्याबाबत मदत करण्यात आली आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील लेखा आणि कोषागारे संचालनालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३१) ९१७३ (१७-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लेखा आणि कोषागारे संचालनालयाच्या विविध कार्यालयांतर्गत गट क संवर्गाच्या २७१४ मंजूर पदांपैकी ७२८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालनालय लेखा व कोषागारे कार्यालयातील गट-क संवर्गातील लेखा लिपिक व कनिष्ठ लेखापाल ही रिक्त पदे बाह्ययंत्रणा संस्थेमार्फत कंत्राटी तत्त्वावर भरण्याच्या अनुषंगाने प्रक्रिया सुरू असून दोन वर्षाकरीता १७० पदे कंत्राटी पध्दतीने भरावीत अशी मागणी लेखा व कोषागार विभागाच्या संचालकांनी सहसचिव, वित्त विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी भरती पध्दतीमुळे ठेकेदारांचाच फायदा, कंत्राटी कामगार असल्याने मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहाराला वाव मिळणे, स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान तसेच कालांतराने मर्जीतील कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी घेण्यासाठी मागणी होणार आहे, आदीमुळे स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांमध्ये नाराजी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी पध्दतीने नोकर भरती करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, राज्यात लाखो युवक बेरोजगार असताना कंत्राटी पध्दतीने भरती न करता स्पर्धा परीक्षा घेवून भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०९-०८-२०२१) :** (१) होय.
(२) संचालनालयाने प्रस्ताव मागे घेतला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील सिंचनाचे आर्थिक मापदंडाचे निकष बदलण्याबाबत

**(३२) ९२०१ (१०-०६-२०२१) श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ८२४ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वातंत्र्यानंतर कोकणामध्ये १.५ टक्केच सिंचन झाले असून अधिक निधी उपलब्ध न केल्याने निधी अभावी कामे होत नसून कोकणात जास्त पाऊस पडून देखील शासनाने निधी न दिल्यामुळे सिंचन कमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दापोली (जि.रत्नागिरी) मतदार संघामध्ये सिमेंट बंधारे व लघु पाटबंधारे निकषामध्ये बसत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील सिंचनाचे आर्थिक मापदंडाचे निकष बदलण्याबाबत शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. मापदंड-२०१७/(४५२/२०१७)/लपा-२, दिनांक १३ जुलै, २०१८ अन्वये लघु पाटबंधारे योजनांसाठी मापदंड प्रसृत करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन पत्र क्र.मापदंड-२०१९/(३७९/२०१९)/लपा-२, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या प्रचलित मापदंडामध्ये सुधारणा करण्याच्यादृष्टीने परिपुर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या क्षेत्रिय कार्यालयांना दिलेल्या सूचनावरील कार्यवाही पुर्ण झाली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील सिंचनाचे आर्थिक मापदंडाचे निकष बदलण्याबाबत व सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२०-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

कोकणामधील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर व नाशिक (अंशत:) या सहा जिल्ह्यातील स्वातंत्र्यानंतर पुर्ण झालेल्या प्रकल्पांमार्फत २,८३,०८३ हे. प्रकल्पीय सिंचन क्षमता आहे. त्यापैकी एकूण १,२९,५७८ हे. सिंचन क्षमता जून, २०२० अखेर निर्मित झाली आहे. यानुसार कोकणामध्ये एकूण ४५.७७% सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार कोकणाकरीता दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून सिंचन क्षमता निर्मिती करण्यात येते.

(२) हे अंशतः खरे आहे.

सिंमेट बंधारे-कोकणातील भौगोलिक परिस्थितीनुसार कोकणात उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत नाला उतार जास्त असल्याने पाणीसाठा तुलनेने कमी होतो, त्यामुळे जलसंधारणाच्या बहुतांश योजना अव्यवहार्य ठरतात. कोकणामध्ये सिमेंट संधानकासाठी आवश्यक वाळूची उपलब्धता अत्यल्प आहे. त्यामुळे वाळू, सिमेंट व खडी दूरवरून आणावी लागते व त्यामुळे संधानकाच्या प्रति स.घ.मी दरात वाढ होते. त्यामुळे कामाच्या अंदाजपत्रकीय किमतीत वाढ होत असल्याने दापोली जि.रत्नागिरी मतदारसंघातील जलसंधारणाच्या बहुतांश योजना शासनाच्या आर्थिक मापदंडामध्ये अव्यवहार्य ठरतात.

लघु पाटबंधारे-कोकण प्रदेशांतर्गत बांधकामाधीन व भविष्यकालीन पाटबंधारे प्रकल्प शासनाचे कोकणातील ल. पा. प्रकल्पांसाठीचे प्रचलित मापदंड रुपये १,७६,७२०/- प्रती स.घ.मी. यामध्ये बसतात. तसेच दापोली (जि.रत्नागिरी) मतदार संघामध्ये ३ पूर्ण झालेले प्रकल्प, ४ बांधकामाधीन प्रकल्प व ६ अवशिष्ट प्रकल्प अशा १३ लघु पाटबंधारे प्रकल्पांचा समावेश असून सदर ४ बांधकामाधीन प्रकल्प ल. पा. प्रकल्पांसाठीचे प्रचलित मापदंडामध्ये बसतात.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी तत्वावरील शुश्रुषा रुग्णालयास आर्थिक मदत करण्याबाबत

**(३३) ९२६४ (१७-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १३९९ ला दिनांक २३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी तत्वावरील पहिले शुश्रुषा रुग्णालय मुंबई दादर येथे सुमारे ५१ वर्षापूर्वी स्थापन करण्यात आले असून शुश्रुषा रुग्णालयामार्फत रुग्णांना परवडणाऱ्या दरात वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असताना दरम्यानच्या काळात कोरोना महामारी संकटामुळे रुग्णालय व्यवस्थापनावर रुपये २० कोटींचा संचित तोटा व बँकेच्या कर्जामुळे रुग्णालय आर्थिक डबघाईस आले असून रुग्णालयाचे अस्तित्वच धोक्यात आले असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक व सहकारी तत्वावरील रुग्णालय संस्था म्हणून शासनाने आर्थिक सहाय्य करावे, अशी मागणी शुश्रुषा रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा यांनी शासनाकडे केली असल्याचेही मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुश्रुषा सिटीझन्स को-ऑप. हॉस्पिटल लि., मुंबई या रुग्णालयास भाग भांडवल उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील अटीस अनुसरुन गरीब व गरजू रुग्णांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदर रुग्णालयाची पात्रता व योग्यता तपासून अभिप्राय देण्यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालास अनुसरुन शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील सहकारी तत्वावरील या ५१ वर्षापूर्वीच्या पहिल्यावहिल्या शुश्रुषा रुग्णालयास आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (१३-०८-२०२१)** : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर संस्थेचा दिनांक ३१/०१/२०२१ अखेर संचित तोटा रुपये सुमारे ६३.७९ कोटी इतका आहे.

(२) होय.

शुश्रुषा सिटीझन्स को-ऑप. हॉस्पिटल लि., मुंबई या संस्थेने विक्रोळी, मुंबई येथे गरजू रुग्णांना परवडणाऱ्या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी भागभांडवल स्वरुपात रुपये २५ कोटी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

(३) होय.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समितीने केलेल्या शिफारशी च्या अनुषंगाने “शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह

हॉस्पीटल लि., मुंबई या सहकारी संस्थेस भागभांडवल" या नविन योजनेस नविन लेखाशीर्ष उघडण्यात नियोजन विभाग, वित्त विभाग व महालेखाकार, मुंबई यांच्या सहमतीने मान्यता देण्यात आली आहे. तसेच विभागाच्या अर्थसंकल्पिय अंदाज सन २०२१-२०२२ भाग-दोन - खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज (White Book) मध्ये सदर योजनेचे नाव समाविष्ठ करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील मा.उच्च न्यायालयाच्या इमारतीचे स्थलांतराचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३४) ९२७६ (११-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ब्रिटीश कालीन मा.उच्च न्यायालयाची इमारत तत्कालीन नियोजनानुसार केवळ ७ न्यायाधीश न्यायालयीन कामकाज पाहू शकतील इतक्या क्षमतेची बांधलेली असताना आजमितीस तेथे सुमारे ४० मा.न्यायाधीश हे दाटीवाटीच्यास्थितीत न्यायालयीन कामकाज पार पाडीत असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयासाठी इतरत्र अन्य इमारत बांधण्यात यावी अशी न्यायपालिका प्रशासनाकडून मागणी करण्यात आल्यानंतर मा.उच्च न्यायालयाचे कामकाज बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (मुंबई) येथील परिसरात स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनामार्फत कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या सदर इमारत बांधकामाच्या प्रस्तावाप्रकरणी मा.केंद्रीय विधी व न्याय मंत्री यांनी लक्ष घालावे अशी विनंती दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१८-०८-२०२१) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ५७/२०१२ मध्ये मा.न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशास अनुसरुन बांद्रा शासकीय वसाहतीच्या पुर्नविकास आराखड्यात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन न्यायालयीन संकुलाचा समावेश करण्यात आला असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभामार्फत शपथपत्रान्वये मा.उच्च न्यायालयास कळविण्यात आले आहे.

(३) उक्त प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु असून, मा.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सदर इमारत बांधकामाच्या प्रस्तावाप्रकरणी मा.कैंद्रीय विधी व न्याय मंत्री यांनी लक्ष घालावे, अशी विनंती दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली असल्याची माहिती राज्य शासनाकडे उपलब्ध नाही. सदरहू माहिती कैंद्रीय विधि व न्याय मंत्रालय, (न्याय विभाग), नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडून मागविण्यात आली असता त्या कार्यालयाने दिनांक २८/०६/२०२१ व दिनांक ५/०७/२०२१ रोजीच्या पत्रांन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी याप्रकारची कोणतीही विंनती दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले नसल्याचे राज्य शासनास अवगत केले आहे.

तसेच, दिनांक २८/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये याबाबतची माहिती सेक्रेटरी जेनरल, सर्वोच्च न्यायालय यांचे कार्यालयाकडून उपलब्ध होऊ शकते, असेही कळविले आहे. त्यानुसार याबाबतची माहिती सेक्रेटरी जेनरल, सर्वोच्च न्यायालय यांचे कार्यालयाकडून शासन पत्र, दिनांक २२/०७/२०२१ व शासन स्मरणपत्र, दिनांक ०९/०८/२०२१ अन्वये मागविण्यात आली आहे. ती शासनास अद्याप अप्राप्त आहे.

(४) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन न्यायालयीन संकुलाकरीता बांद्रा शासकीय वसाहत पुनर्विकास प्रकल्पाच्या आराखड्यामध्ये जागा अधोरेखित करण्यात आली आहे. तथापि, तेथे उपलब्ध होणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळाची मर्यादा विचारात घेऊन पहाडी गोरेगाव येथील जागेचा प्रस्ताव शासनामार्फत उच्च न्यायालय प्रशासनास देय करण्यात आला. तथापि, उच्च न्यायालय प्रशासनाने त्यास नकार दिला आहे. उच्च न्यायालयाने सुचित केल्यानुसार नवीन न्यायालयीन संकुलाकरीता पर्यायी जागेसंबंधी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीत कारखान्यांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याबाबत

**(३५) ९२९९ (१०-०६-२०२१) श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे औद्योगिक परिसरातील घरडा केमिकल्स कारखान्यात दिनांक २० मार्च, २०२१ रोजी रिॲक्टरचा स्फोट होऊन घडलेल्या दुर्घटनेत ४ कामगारांचा मृत्यू व २ कामगार गंभीररित्या जखमी झाल्याचे तसेच दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास एमआर स्पेशालिटी कारखान्यात रिॲक्टरचा स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीमुळे औद्योगिक वसाहतीमध्ये धुर व उग्र वास पसरल्याने आजूबाजुच्या गावातील नागरिकांना त्रास झाला असून गेल्या चार महिन्यात विविध कंपन्यामध्ये झालेल्या स्फोटात १० जणांचा मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये ५५ लाख व जखमींना रुपये २० लाख देऊन मृतांच्या नातेवाईकांना कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन कंपनी व्यवस्थापनामार्फत देण्यात आल्याचे पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी जाहीर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृतांच्या वारसांना तसेच गंभीर जखमींना कंपनी व्यवस्थापनामार्फत जाहीर केलेली अर्थसहाय्य रक्कम अदा करण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा व मृतांच्या नातेवाईकांना कंपनीत नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कंपन्यांविरुध्द कारवाई करुन भविष्यात अशा घटना घडू नयेत तसेच, लोटे औद्योगिक परिसर येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०५-०८-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

घरडा केमिकल्स,लोटे परशुराम औद्योगिक वसाहत, ता.खेड, जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक २०/०३/२०२१ रोजी ईलेक्ट्रीक शॉर्टसर्किटमुळे ज्वालाग्राही रसायनांच्या वाफांना आग लागून चार कामगारांचा सदर दुर्घटनेत मृत्यू झाला असून दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या एका कामगाराचा उपचारादरम्यान दिनांक २८/०३/२०२१ रोजी मृत्यू झाला आहे.

एम.आर.स्पेशॅलिटी केमिकल्स प्रा.लि., या कारखान्यात स्फोट झालेला नसून दिनांक २८/०४/२०२१ रोजी स्टॅटीक ईलेक्ट्रीसिटीमुळे आग लागली.

(२) सदर आगीमुळे लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमध्ये धूर व उग्रवास पसरल्याने आजूबाजूच्या गावातील नागरिकांना त्रास झालेला नसून गेल्या चार महिन्यात लोटे औद्योगिक वसाहतीत पाच कारखान्यांमध्ये झालेल्या स्फोट व आगीच्या घटनेत ११ कामगारांचा मृत्यू झाला असून सहा कामगार व आग विझविण्यासाठी आलेला बाहेरील एक व्यक्ती असे एकूण सात जण जखमी झाले आहेत.

(३) व (४) होय हे खरे आहे.

घरडा केमिकल्स लि., या कारखान्यात घडलेल्या अपघातातील पाच मृत कामगारांच्या वारसास सानुग्रह अनुदान म्हणून प्रत्येकी रुपये ५५.०० लक्ष इतके अदा करण्यात आले असून मृत कामगारांच्या कुटुंबियांना पुढील पाच वर्षासाठी एकत्रित रुपये १,९०,०००/- इतके प्रत्येक महिन्याला अतिरिक्त सानुग्रह अनुदान देण्यात येणार असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने कळविले आहे.

मृत कामगारांच्या नुकसान भरपाईपोटी एकूण रुपये ७२,४२,२२५/- इतकी रक्कम मा.न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

(५) सदर प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात आली असून घरडा केमिकल्स लि., या कारखान्याचे भोगवटादार व व्यवस्थापकाविरूध्द प्रत्येकी एक असे एकूण दोन खटले मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

एम.आर.स्पेशॅलिटी केमिकल्स प्रा.लि.,या कारखान्याविरूध्द चौकशी करण्यात आली असून चौकशीत आढळून आलेल्या नियमांच्या भंगाकरीता कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,खेड यांच्या न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आला आहे.

भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी कारखाना व्यवस्थापनाकडून सुरक्षा लेखा परीक्षण करून घेण्यात येत असून कामगार व कारखाना व्यवस्थापन यांचेकरीता स्टॅटीक ईलेक्ट्रीसिटी विषयक जागृतीपर कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय हे लोटे परशुराम एमआयडीसी पासून १८ कि.मी.अंतरावर चिपळूण येथे असून खेर्डी, गाणे खडपोली सोयीच्या मध्यस्थानी असल्याने स्थलांतरीत करण्यात आले नसल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील दिवाणी न्यायालयाची नवीन इमारत अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) ९३१७ (११-०६-२०२१) श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ७२९० ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारत बांधकामाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे मा.उच्च न्यायालय यांच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये रुपये ४.८२ कोटी इतक्या अंदाजित रकमेचा सुधारीत प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीची मान्यता प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेनसार विधी व न्याय विभाग, शासन निर्णय, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये रुपये ४,८२,४१,२३२/- इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर काम अर्थसंकल्पीत करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर काम अर्थसंकल्पात समाविष्ट करुन उक्त मान्यता प्राप्त निधी वितरित करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर दिवाणी न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०४-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

दापोली, जि.रत्नागिरी येथील दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा रुपये ४८२.४१ लक्ष इतक्या किंमतीचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून दिनांक १९ ऑगस्ट २०१९ शासनास प्राप्त झाला होता.सदर प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीच्या दिनांक १९ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय हे खरे आहे.

विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीबी-१११९/प्र.क्र.१०१/का-१३, दिनांक २५ जानेवारी २०२१ अन्वये रुपये ४,८२,४१,०००/- इतक्या किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर काम महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२१-२२ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बाबीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे.

(३) वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २४ जून २०२१ अन्वये अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ३० टक्के एवढा निधी चालू कामांच्या बांधकामावरील खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीतून दापोली (जि.रत्नागिरी) येथील दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## परभणी शहरामध्ये अद्ययावत बसपोर्ट उभारण्याचे काम सुरू करण्याबाबत

**(३७) ९३२० (१५-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) शहरामध्ये अद्ययावत बसपोर्ट उभारण्यासाठी राज्य शासनाने १३ कोटी ४ लाख ४८ हजार ६०० रूपयांच्या निधीला सन २०१८ मध्ये मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्ययावत बसपोर्टच्या कामासाठी जुनी इमारत जमीनदोस्त करण्यात आली तर प्रवाशांच्या सोयीसाठी तात्पुरते टिन शेड उभारण्यात आले असून सदर अद्ययावत बसपोर्टचे मागील ३ वर्षांमध्ये केवळ फुटींगचे काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्रवाशांची गैरसोय दूर होण्याकरीता अद्ययावत बसपोर्टचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू बसपोर्टचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) परभणी येथे नवीन बसस्थानकाच्या पुर्नबांधणीच्या कामाचा कार्यादेश जून, २०१९ मध्ये देण्यात आला. त्यानंतर ऑगस्ट, २०१९ मध्ये भूमीपुजन करुन काम सुरु करण्यात आले. सदर बसस्थानकाचे काम जुन्या बसस्थानकाच्या जागी असल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी प्रथमत: तात्पुरते बसस्थानकाचे शेड उभारण्यात आले. त्यानंतर जुने बसस्थानकाचे तोडकाम करतेवेळी जुन्या बसस्थानकातील उपहारगृह परवानाधारकाने जागा रिक्त न करता सदर प्रकरण न्यायप्रविष्ट केले. त्यामुळे काम बंद पडले. सदर न्यायालयीन प्रकरणाचा निकाल राज्य परिवहन महामंडळाच्या बाजूने माहे मार्च, २०२० रोजी लागला. परंतु कोरोना साथीचा प्रादुर्भाव उदभवल्यामुळे शासनाने माहे मार्च, २०२० पासून राज्यात टाळेबंदी घोषित केल्यामुळे बांधकामात प्रगती साधता आली नाही. सध्यस्थितीत बसस्थानकाच्या फुटींगचे काम पूर्ण झालेले असून, पुढील काम प्रगतीपथावर आहे.

---

## पुण्यातील मांजरी येथील सिरमच्या एसईझेडमधील इमारतीला आग लागून पाच कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३८) ९३५५ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील मांजरी येथील सिरमच्या एसईझेडमधील इमारतीतील चौथ्या व पाचव्या मजल्यावर दिनांक २३ जानेवारी, २०२१ रोजी आग लागल्याची घटना घडली असून या आगीत पाच कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आग लागण्यामागची कारणे काय आहेत व या आगीत मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू आगीस जबाबदार असलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-०८-२०२१) :** (१) सिरम इन्स्टीटयूट ऑफ इंडिया प्रा.लि., मांजरी (बुद्रुक) ता.हवेली, जि.पुणे या कारखान्यातील एसईझेड-तीन या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील पोट माळयावर दिनांक २१/०१/२०२१ रोजी दु.०२.२६ वा. आग लागली. सदर आगीत पाच कंत्राटी कामगारांचा गुदमरुन मृत्यू झालेला आहे.

(२) सदर आगीची घटना इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली असल्याचे चौकशी दरम्यान आढळून आले आहे.

आगीच्या घटनेत मृत पावलेल्या कंत्राटी कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये २५ लक्ष याप्रमाणे एकूण रुपये १,२५,००,०००/- इतकी आर्थिक मदत कारखाना व्यवस्थापनाने दिली आहे. याशिवाय नुकसान भरपाई कायद्यांतर्गत घटनेतील दोन मृत कामगारांच्या वारसांना अनुक्रमे रुपये १५,५९,८५०/- आणि रुपये १४,०३,०७३/- इतकी रक्कम दिली असून उर्वरीत तीन मृत कामगारांच्या वारसांना दि न्यू इंडिया ॲशुरन्स कंपनी यांचेकडून कायदेशीर नुकसान भरपाई मंजूर झाली असून अनुक्रमे रुपये १६,३२,०७०/- रुपये १५,००,२००/- व रुपये १३,८०,६२८/- इतक्या रकमांचे धनादेश मा.आयुक्त, नुकसान भरपाई, पुणे यांचेकडे जमा करण्यात आले आहे.

(३) सदर घटनेची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे यांनी चौकशी केली आहे.

घटनेच्या ठिकाणी उत्पादन प्रक्रिया सुरु झालेली नसल्याने आणि आगीची घटना इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्कीटमुळे घडली असल्याने सदर घटना कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत येत नाही. सबब, कारखाने अधिनियम, १९४८ अन्वये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून सदर कारखान्याच्या व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर सुधार प्रन्यास येथे भुखंड नियमित करण्याबाबतची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ९३७३ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ५१९ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यास येथील भुखंड नियमित करण्याबाबतची सुमारे तीन हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक ७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक २७/०८/२०१९ नुसार, गुंठेवारी अधिनियमाखालील प्रकरणासाठी नागपूर महानगरपालिकेस प्राधिकरण म्हणून घोषीत करण्यात आले होते. त्यापूर्वी यासाठी नागपूर सुधार प्रन्यास हे प्राधिकरण होते.

त्यानुसार, नागपूर सुधार प्रन्यासकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांपैकी नागपूर महानगरपालिकेने, मागणी केलेल्या, मुख्य अभिन्यासाच्या ३२३६ आणि वैयक्तीक धारकांच्या १२,०३९ इतक्या नस्त्या, त्यावेळी नागपूर सुधार प्रन्यासने, महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या होत्या. इतर नस्त्या त्यावेळी नागपूर सुधार प्रन्यासच्याच अभिलेखामध्ये उपलब्ध होत्या.

तद्नंतर, गुंठेवारी खालील प्रकरणांसंदर्भात, नागपूर सुधार प्रन्यासला दिनांक ०९/०४/२०२१ च्या अधिसूचनेद्वारे पुन:श्च प्राधिकरण म्हणून अधिकार प्राप्त झाल्यानंतर, नागपूर मनपाकडे पाठविलेल्या मुख्य अभिन्यासाच्या एकूण ३२३६ नस्त्यांपैकी २२३६ व वैयक्तिक धारकांच्या एकूण १२०३९ नस्त्यांपैकी ७००५ इतक्या नस्त्या नागपूर सुधार प्रन्यासला प्राप्त झाल्या आहेत. अद्याप ६०३४ इतक्या नस्त्या नागपूर महानगरपालिकेकडून, नासुप्रला प्राप्त झालेल्या नाहीत.

सदरच्या सर्व नस्त्या नागपूर सुधार प्रन्यासला प्राप्त झाल्यानंतरच आणि यापैकी किती प्रकरणात नागपूर मनपाने परवानग्या दिल्या आहेत व प्रलंबित किती आहेत याची शहानिशा करता येईल व त्यानंतरच प्रलंबित प्रकरणामाहिती उपलब्ध होऊ शकते. त्यानुसार नागपूर मनपाकडून सर्व नस्त्या उपलब्ध करुन देण्याबाबत, नासुप्रने नागपूर मनपास विनंती केली आहे. अशी वस्तुस्थिती, नागपूर सुधार प्रन्यासच्या अहवालात नमूद करण्यात आलेली आहे.

---

## अकोला शहरातील विमानतळाकरीता भूसंपादन करण्याबाबत

**(४०) ९३९३ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११४१ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर (जि.अकोला) येथील स्थानिक विमानतळाकरीता भूमी अधिग्रहण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासनाकडे सादर केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी संयुक्त मोजणीअंती सुमारे २२.२४ हे.आर. जमीन संपादनाची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले असून या भूसंपादनासाठी शासनस्तरावर प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१०-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संयुक्त मोजणीअंती सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी सुमारे २२.२४ हे.आर जमिनीची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अकोला विमानतळाच्या विकासाबाबत व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास करण्याबाबत शासनाने सुचविले असून, अकोला विमानतळ हे भारतीय विमानपतन प्राधिकरण यांच्या मालकीचे असल्याने सदर विमानतळाच्या व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपतन

प्राधिकरण यांनी करावा असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने भारतीय विमानपतन प्राधिकरण यांना कळविले आहे. व्यवहार्यता अहवाल अद्याप प्राप्त झाला नसून सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर अहवालाच्या अनुषंगाने खाजगी जमीन संपादनाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागभीड (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) व वर्धा येथील धानाची पैसेवारी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत

**(४१) ९४०० (११-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७३९५ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) व वर्धा येथील धानाची पैसेवारी सन २०२०-२१ या वर्षात ५०% पेक्षा कमी असूनही शेतकऱ्याच्या खात्यात केवळ एक हजार रूपये जमा करुन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याची बाब दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यातील १ हजार ३३८ गावांची पैसेवारी ५० पैशाच्या आत असून दुष्काळ परिस्थितीकरीता सवलती जाहीर करुनही अद्याप शेतकऱ्यांना सवलतीचा लाभ मिळाला नसल्याचे दिनांक २८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करुन योग्य तो विमा लाभ मिळावा तसेच दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेल्या गांवाना त्वरीत निधी उपलब्ध व्हावा, या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. वर्धा जिल्ह्यात धान पिकाचे उत्पन्न नाही. खरीप २०२०-२१ हंगामात नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यात १३३८ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी व चंद्रपूर जिल्ह्यात १५११ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी घोषित करण्यात आली आहे. नागभीड (ता.नागभीड, जि.चंदंपूर) येथील शेतकऱ्यांच्या खात्यात केवळ एक हजार रूपये जमा करुन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) खरीप २०१७ हंगामापासून दुष्काळ घोषित करण्यासाठी केंद्र शासनाने लागू केलेल्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केली जात आहे. पैसेवारीच्या आधारे दुष्काळ घोषित करण्यात येत नाही. त्यामूळे पैसेवारीनुसार सवलती देण्यात येत नाहीत. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील तरतूदी व निकषांनुसार सन २०२० च्या खरीप हंगामात वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ आढळून आला नाही.

(३) खरीप २०२० हंगामात वर्धा जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या एकूण १८७ लाभार्थ्यांना नुकसान भरपाईसाठी रुपये ३५.८९ लक्ष वाटप करण्यात आलेले आहे. तसेच पीक कापणी प्रयोगाच्या आधारे पात्र ठरलेल्या एकूण ८०१३ लाभार्थ्यांना नुकसान भरपाईपोटी रुपये १३२८ लक्ष देय असून सदर रक्कम संबंधित विमा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नागभीड तालुक्यात (जि.चंद्रपूर) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाईसाठी पात्र ठरलेल्या एकूण ८५८८ लाभार्थ्यांना नुकसान एकूण रुपये १,७३,४०,७९२/- इतकी रक्कम विमा कपनीमार्फत मंजूर झाली असून, सदर रक्कम बँकेमार्फत शेतकऱ्यांना वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला शहरामध्ये रिलायन्स जियो, स्टरलाईट टेक व इतर खाजगी दूरसंचार कंपनीने अनधिकृतरित्या रस्त्यांचे खोदकाम केल्याबाबत

**(४२) ९४०४ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३५३३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील रिलायन्स जिओ प्रायव्हेट लिमिटेड व स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने अनधिकृतरित्या महत्वाच्या रस्त्यांचे खोदकाम केल्यामुळे शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक नागरिकांचे छोटे-मोठे अपघात होऊन निष्पाप लोकांचा बळी गेल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनधिकृत खोदकामामुळे वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात प्रतिकूल परिणाम होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने महानगरपालिकेचा सुमारे ३० कोटी रुपयांचा महसूल बुडविल्यामुळे उक्त कंपनीवर कारवाई करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी देऊनही अद्याप फौजदारी कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बांधकाम विभागाच्या (अकोला मनपा) अधिकारी व कर्मचारी यांचेवर तसेच सदर दोषी कंपनीवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन कंपन्याच्या खोदकामामुळे, रस्त्याची दुरावस्था, नागरिकांचे छोटे-मोठे अपघात आणि त्यामुळे निष्पाप नागरिकांचे बळी गेल्याबाबत अथवा यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत, महापालिकेच्या अभिलेखामध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही अथवा अशी परिस्थिती आढळून आलेली नाही.

(३), (४) व (५) महानगरपालिकेची परवानगी न घेता महानगरपालिका हद्दीत, अनधिकृतरित्या ओएफसी केबल टाकल्यामुळे बांधकाम विभागाद्वारा रिलायन्स जिओ इन्फोकॉम अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांचेविरोधात दिनांक २३/१२/२०१९ आणि दिनांक २९/१२/२०१९ रोजी पोलीस तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

प्रत्यक्ष शहरातील ९३ रस्त्यांवर ७३.०४ कि.मी. चे सर्वेक्षण करण्यात आलेले असून, यापैकी ३८.९३३ कि.मी. क्षेत्रावर अनधिकृतरित्या केबल टाकल्याचे निदर्शनास आल्यानंतर, यापोटी रिलायन्स जिओ कंपनीकडून "रस्ता दुरुस्ती शुल्कापोटी रुपये ८,०२,७३,६०१/- व दंडापोटी रुपये १६,०९,४७,२०२/- असे एकूण रुपये २४,०८,२०,२०३/-" वसूल करण्यात आलेले आहे.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसी परिसरातील कारखानदारांना महापालिकेने अतिरिक्त कराची नोटीस दिल्याबाबत

**(४३) ९४२४ (१८-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसी परिसरातील शेकडो कारखानदारांना कल्याण-डोंबिवली महापालिकेने अतिरिक्त कराबाबत नोटीस दिल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने मूळ करापेक्षा अधिक कर लावल्यामुळे कराच्या पावत्यांमध्ये दुरुस्ती करून द्यावी तसेच ज्या कंपन्या सन २००२ सालाच्या आधीपासून कार्यरत आहेत त्यांना नियमानुसार कमी कर लागू करावा अशा मागण्या कारखानदारांनी महापालिकेकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखानदारांनी अभय योजना लागू व्हावी याकरीता महापालिकेला आवश्यक असलेली कागदपत्रे सुध्दा दिली आहेत मात्र, बिलामध्ये दुरुस्ती करून देण्याऐवजी सदर कारखान्यांला जप्तीची नोटीस पाठविण्यात येत असल्याने कारखानदार कोरोना काळात मोठ्या आर्थिक अडचणीत सापडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कारखानदारांच्या बिलात तात्काळ दुरुस्ती करून अभय योजना लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१)** : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक १५/१०/२०२० ते दिनांक १५/०१/२०२१ या कालावधीत ७५% व्याज माफिची "अभय योजना-२०२०" जाहीर केली असून, त्यास नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे.

तथापि, सर्वसाधारण सभेने मालमत्ता कर सुधारित केल्याप्रकरणी जादा दिलेली मालमत्ता कराची देयके रद्द करून सुधारीत देयके देण्यात येत असल्याने तसेच त्यावर व्याजाची आकारणी होत नसल्याने अशा मिळकतींना व्याजमाफिची अभय योजना लागू करण्यात आलेली नाही.

कारखानदार मिळकतधारकांकडून मालमत्ता कर वसुलीपोटी एकूण ३८ मिळकतधारकांना "जप्ती पुर्वीच्या सूचना" देण्यात आलेल्या आहेत.

सन २००२ व त्यापुर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत असलेल्या व महानगरपालिकेकडून कर निर्धारण झालेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्यात सुधारणा करून सर्व्हेक्षणाअंती क्षेत्रफळात दुरूस्ती असल्यास त्याप्रमाणात मालमत्ता कर कमी होऊन कारखानदारांना निश्चित दिलासा मिळणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विमुक्त जाती व भटक्या जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात घरकुल मंजूर होणेबाबत

**(४४) ९४५३ (११-०८-२०२१) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात घरकुले मंजूर झाले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरीकांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकारणी शासनाने चौकशी करुन अन्याय दूर करुन विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरीकांसाठी उक्त योजनेंतर्गत घरकुले मंजूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (११-०८-२०२१) :** (१) शासन निर्णय दिनांक २४/०१/२०१८ मधील तरतुदींनुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना राबविण्यात येत आहे. यानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकसंख्येला विचारात घेउन बृहद आराखडा तयार करण्यात येतो. सदर आराखड्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर केले जातात. सदर प्रस्तावांवर अंतिम निर्णय शासनस्तरावर घेण्यात येतो.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्याला सिंचनासाठी विशेष अनुदान देण्याबाबत

**(४५) ९४५८ (१५-०७-२०२१) श्री.राजेश राठोड : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ५८६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील प्रकल्पांच्या क्षेत्रात नेहमी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होत असल्यामुळे प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा होत नसून पाणीसाठा कमी होत असल्याने पूर्ण क्षमतेने सिंचन होत नाही त्यामुळे प्रकल्पात पाण्याच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक वर्षी सिंचन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील बांधकामाधीन प्रकल्पांसाठी शासन अंशदान, केंद्र शासन अर्थ सहाय्यित बळीराजा जल संजीवनी योजना (BJSY), प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) या योजनांमार्फत मिळणारा निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२५-०८-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मराठवाडा प्रदेशांतर्गत मोठे, मध्यम व लघु (एकूण १०९७) प्रकल्पांची एकूण प्रकल्पीय सिंचन क्षमता १४.३४ लक्ष हेक्टर असून त्यापैकी जून २०२० अखेर ११.७७ लक्ष हेक्टर (८२%) सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. बांधकामाधीन ४२ प्रकल्पाद्वारे २.५७ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीसाठीची आवश्यक कामे निधी उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.

मराठवाडा प्रदेशातील प्रकल्पांच्या क्षेत्रात काही वर्ष वगळता नेहमीच सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान होत असल्यामुळे प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा होत नाही. कमी पाणीसाठ्यामूळे पूर्ण क्षमतेने सिंचन होत नाही.

(२) मराठवाड्यातील ४२ बांधकामाधीन प्रकल्पांसाठी सन २०२१-२२ च्या वार्षिक आखणीनुसार रुपये १६००.०५ कोटी निधीची तरतूद मंजूर करण्यात आली असून त्यापैकी शासन अंशदानाकरीता रुपये १२८२.२११६ कोटी, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) करीता रुपये १३२.२५ कोटी व बळीराजा जल संजीवनी योजनेकरीता रुपये १५१.८०९ कोटीची तरतुद आहे.

मराठवाड्यातील प्रकल्पांसाठी दिनांक ३१/०७/२०२१ अखेर शासन अंशदानापोटी रुपये १२४.९९६२ व बळीराजा जलसंजीवनी योजनेंतगत रु,११.३८५७ असा एकूण रुपये १३६.३८१९ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत

**(४६) ९५०६ (१५-०७-२०२१) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या तसेच महत्वाच्या औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पुरक ठरणाऱ्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाला शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(२) असल्यास, उक्त राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार असून शासनाने मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१७-०८-२०२१) :** (१) व (२) पैठण ते औरंगाबाद मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते.

पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या तसेच महत्त्वाच्या औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पूरक ठरणारा राज्य मार्ग दिनांक ३ जानेवारी, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय महामार्ग क्र. एनएच-७५२ ई (NH ७५२ E) असा घोषित झाला आहे. केंद्र शासनाने सदर रस्ता मध्यम प्राधान्यक्रमामध्ये अंतर्भूत केला असून सदर रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची

कार्यवाही हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजुरीनंतर निश्चित होणाऱ्या कामाच्या स्वरुपानुसार पुढील कार्यवाही होणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाच्या मंत्रालय तसेच इतर कार्यालयामध्ये सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आल्याबाबत

**(४७) ९५२८ (११-०६-२०२१) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मंत्रालय तसेच इतर कार्यालयातून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होवूनही अधिकारी व कर्मचाऱ्यांची पुन्हा शासकीय सेवेत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पुन्हा शासन सेवेत घेण्याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच माहे मे, २०२१ अखेर एकूण किती अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पुन्हा शासन सेवेत घेण्यात आले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०२-०८-२०२१) :** (१) व (२) राज्य शासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीनंतर शासकीय सेवेत मुदतवाढ देण्यात येत नाही. तथापि, मुख्य सचिव पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांना All India Services (Death-Cum Retirement Benefits) Rules १९५८ मधील नियम १६(१) अन्वये केंद्र शासनाच्या मान्यतेने शासकीय सेवेत मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. प्रशासकीय निकड विचारात घेऊन मागील ५ वर्षांत मुख्य सचिव पदावर कार्यरत असणाऱ्या ३ अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबईतील समुद्राचे खारेपाणी पिण्यायोग्य करण्याच्या प्रकल्पाबाबत

**(४८) ९५४० (११-०६-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील समुद्राचे खारेपाणी गोडे करून मुंबईकरांच्या पिण्याच्या पाण्याची तहान भागविण्यासाठी रोज २०० दशलक्ष लीटर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी कुठलीही निविदा न काढता करोडो रूपये वाया घालवून मनोरा येथील मोक्याची १२ एकर जमीन खाजगी कंपनीला देण्याचे मुंबई महानगरपालिकेचे नियोजन असून पुढील २० वर्षे ईएमआयप्रमाणे सदर जमीन कंपनीला देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अहवालानुसार मुंबईमध्ये रोज ९०० दशलक्ष लीटर पाणी चोरीला जात असून ह्या चोरीला परिणामकारकरित्या आळा घालून चोरीला जाणारे केवळ २०० दशलक्ष लीटर पाणी मुंबई महानगर प्रशासनाने रोखले तर ३५०० कोटीची बचत करणे तसेच सदरहू मोक्याची १२ एकर जमीन शाळा, कॉलेज, दवाखाना इत्यादी नागरिकांच्या मूलभूत सोयीसाठी राखून ठेवणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजमितीस महानगरपालिकेमार्फत त्यादृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या आयडीई वॉटर टेक्नोलॉजी या कंपनीला मनोरा येथील मोक्याची जमीन तसेच पुढील २० वर्षे ईएमआयप्रमाणे पैसा देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू पाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, पाण्याची चोरी कमी करण्यासाठी विभाग स्तरावर विविध उपाययोजना हाती घेण्यात येतात.

तसेच सदर जागा पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारीत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाणी चोरी होऊ नये याकरीता महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात/येत आहेत:-

- विभाग स्तरावर विविध अनधिकृत जलजोडण्या शोधून त्या खंडीत करण्याची कार्यवाही वेळोवेळी हाती घेण्यात येते.
- मागील तीन वर्षांत सुमारे १०,५०० जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या असून, त्यापैकी ५० जलजोडण्या पात्रतेचा निकष व कागदपत्रांची पूर्तता पूर्ण केल्यानंतर नियमित करण्यात आल्या आहेत.
- काही ठराविक अपवाद वगळता दिनांक ०१/०१/२०२० नंतरच्या सर्व झोपड्यांना अधिकृत जलजोडणी देण्याकरीता माहे जानेवारी, २०१७ पासून नवीन धोरण अंमलात आणले आहे.

मे. आय.डी.ई. वॉटर टेक. लि. या कंपनीला महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट एनेबलिंग ऑथोरिटी अधिनियम २०१८ अन्वये स्वीस चॅलेंज तत्वावर केवळ सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम देण्यात आले आहे.

प्रकल्प राबविण्याच्या अटी व शर्ती निश्चित करुन प्रत्यक्ष कामासाठीच्या निविदा मागविल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

तसेच, सदर प्रकल्पांतर्गत समुद्राचे पाणी व्यस्त जलाभिसरण (RO) पध्दतीने शुध्द करुन पिण्यायोग्य मानकाचे करण्यात येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळण्याबाबत

**(४९) ९५४३ (१६-०६-२०२१) श्री.राजेश राठोड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.नरेंद्र दराडे, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विनायकराव मेटे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदोन्नतीची सर्व १०० टक्के रिक्त पदे ही सेवा जेष्ठतेनुसार भरण्याचे आदेश शासनाने दिले असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २५ मे, २००४ रोजी केलेल्या कायद्यानुसार मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता परंतु, मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरवले असून सदरचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ३३ टक्के मागासवर्गीयांची पदोन्नतीची पदे राखीव ठेवून अन्य पदे सेवाजेष्ठतेनुसार भरण्याचे दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी आदेश देऊनही पुन्हा दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदोन्नतील १०० टक्के पदे बिंदू नामावलीचा विचार न करता भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे मागासवर्गीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत मागासवर्गीय पदोन्नतीची पदे रिक्त ठेवण्याची आवश्यकता असतानाही आपलाच आदेश शासनाने बदलण्याचे कारण काय आहे, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिनांक ७ मे, २०२१ रोजीचा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२८-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) व (४) पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणाऱ्या मा.उच्च न्यायालय यांच्या दिनांक ०४/०८/२०१७ च्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही तसेच पदोन्नतीच्या कोटयातील मागासवर्गीयांच्या राखीव जागा रिक्त ठेवता येणार नाहीत, असे कायदेशीर अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यामुळे दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे सेवा ज्येष्ठतेनुसार भरण्याचे आदेश दिले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या कार्यालयात अनियमितता होत असल्याबाबत

**(५०) ९५४७ (१५-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या कार्यालयासंबंधी जनतेच्या तक्रारींच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी कार्यालयास आकस्मिक भेट दिली असता कार्यालयात अधिकारी, कर्मचारी नेहमी गैरहजर असल्याचे तसेच २ कर्मचारी उपस्थित असणे, अन्य कर्मचारी कोणतीही सूचना न देता मागील २४ दिवसांपासून अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सदर बाब मा.पर्यावरण राज्यमंत्री व व्यवस्थापकीय संचालक, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मा.राज्यमंत्री यांनी कार्यवाहीबाबत संबंधितांना निर्देश देऊनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१०-०८-२०२१) :** (१) उप प्रादेशिक कार्यालय, अकोला येथे दिनांक २४/०२/२०२१ रोजी लोकप्रतिनिधीनी भेट दिली असता कार्यालयात प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी व प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथील वाहन चालक उपस्थित होते.

(२) जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २३/०२/२०२१ पासून जिल्ह्यामध्ये कोविड-१९ या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संचारबंदी लागू केली होती. शासकीय कार्यालयांसाठी १५% उपस्थिती अनिवार्य होती. त्यानुसार त्या कार्यालयामध्ये ७ अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून १५% प्रमाणे १ कर्मचारी उपस्थित राहणे आवश्यक होते.

(२) व (३) उप प्रादेशिक कार्यालय, अकोला येथील कर्मचारी हे कोविडची बाधा, विलगीकरण व प्रकृती अस्वास्थ्यामुळे कार्यालयात काही कालावधीसाठी अनुपस्थित होते. संबंधीतांनी दूरध्वनीद्वारे कार्यालयात अनुपस्थितीबाबत कळविले होते. कार्यालयात रुजू होताना संबंधीतांनी वैद्यकीय प्रमाणपत्रासह रजा अर्ज सादर केले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कर्मचाऱ्यांनी कार्यालयात विना परवानगी अनुपस्थित राहू नये, यासंदर्भात सर्व कार्यालयास परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.